|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : १७ सोमवार दि. १५ एप्रिल २०२४ ते रविवार दि. २१ एप्रिल २०२४ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## मैत्रीत मित्रांचा काहीच नसतो नेम कर्जबाजारी मित्राने मैत्रिणीचा केला गेम



पुणे/क्राईम रिपोर्टर

पैशासाठी माणूस कुठल्याही थराला जातो. पैशासमोर नाती गोती दोस्ती यारी सर्व काही फिके ठरते. पुण्याच्या विमान नगर भागात एका तरुणाने पैशासाठी आपल्या मैत्रिणीचे अपहरण करून नंतर तिला ठार मारले. विशेष म्हणजे तिच्यासाठी एक दिवस अगोदरच खड्डा खोदून ठेवण्यात आला होता. या हत्याकांडातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. कर्जबाजारी मित्राने खंडणीसाठी ...पान २ वर

## सैतान अंगात शिरल्याची समजूत त्यांची खुळी आई-वडिलांनीच दिला चिमुकल्याचा नरबळी

ठाणे/क्राईम रिपोर्टर

शाहू, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात खरे तर अंधश्रद्धेला थारा नाही. पण दुर्दैवाने केंद्रात आणि राज्यात संविधानापेक्षा धर्म आणि आस्था मानणाऱ्या अंधभक्तांचे सरकार असल्याने राज्यात जादू टोना विरोधी कायदा असतानाही नरबळीच्या घटना घडत आहे. भोळ्या भाबड्या महिलांचे भोंदू बाबांकडून लैंगिक शोषण केले जात आहे. देवाची भीती दाखवून श्रद्धाळूनची फसवणूक केली जाते. देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली सध्या भोंदू बाबांची दुकाने सुरु आहेत. पण सरकारच अंधभक्तांचे असल्याने कारवाई कोण करणार? खरे तर महाराष्ट्र प्रज्ञावंतांचा आहे. समाज सुधारकांचा आहे. पण २०१४च्या नंतर केंद्रात आणि महाराष्ट्रात जे धर्मान्दांचे सरकार आले त्यांनी महाराष्ट्राची सामाजिक प्रगल्भता मंत्रालयातील केराच्या टोपलीत फेकून दिली. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई सारख्या महानगरात सुद्धा भोंदू बाबांच्या टपऱ्या खुलेआम सुरु आहेत. आणि कोणी विरोध केला तर त्याला धर्म विरोधी नास्तिक ठरवले जाते. अंधश्रद्धेतून मानवत आणि नांदोसमध्ये मोठे हत्याकांड घडले. त्यामुळे दाभोलकर, शाम मानव यासारख्या लोकांनी अंधश्रध विरोधी चळवळ सुरु केली. त्यामुळे सरकारला जादूटोना विरोधी कायदा आणावा लागला. पण त्याची अमलबजावणीच होत नसल्याने आजही नरबळीच्या घटना घडत आहेत. ठाणे जिल्ह्यातील मुंब्र्यात अशाच एका घटनेत दीड वर्षाच्या मुलाच्या अंगात शैतान येते अशा खुळचट समजुती मधून आई बापानेच पोटच्या पोराचा नरबळी दिला आणि एका निनावी पत्रामुळे या भयंकर घटनेचा छडा लागला व पोलिसांनी आरोपी आई-वडिलांना अटक केली.



राज्यात एकीकडे लोकसभेची धामधुम सुरू असताना ठाण्यामध्ये धक्कादायक घटना समोर आली आहे. ठाण्यातील मुंब्रा परिसरात एका आईने आपल्या १८ महिन्याच्या मुलीचा नरबळी दिला असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आई-वडिलांना अटक केली आहे. ठाण्यातील मुंब्रा इथं ही संतापजनक घटना घडली आहे. अघोरी कृत्यासाठी १८ महिन्यांच्या पोटच्या मुलीचा आई-वडिलांची बळी दिला असल्याचं समोर आलं आहे. बाळाच्या अंगात शैतान येतो, असं सांगून आईने आपल्या बाळाला स्माशानभूमीत घेवून गेली होती. त्यानंतर तिथे तिची हत्या करण्यात आली, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा सगळा प्रकार एका निनावी पत्रामुळे उघड झाला आहे. पोलिसांना एक निनावी पत्र सापडलं त्यानंतर तपास केला असता सगळा प्रकार समोर आला. पोलिसांनी आई वडिलांना ताब्यात घेतलं. सुरुवातीला दोघांनीही उडवाउडवीची उत्तर दिली. मुलांचा सांभाळ करता येत नसल्याने हत्या केल्याची खोटी कहाणी आईने रचली होती. पण पोलिसांनी खाक्या दाखवताच दोघं पोपटासारखे बोलायला लागले. बाळाच्या ऋअंगात शैतान येतो, त्यामुळे अघोरी कृत्यासाठी हत्या केल्याचे दोघांनी कबूल केलं आहे. मुंब्रा पोलिसांनी मुलीच्या आई वडिलांना अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ठाणे पोलिसांच्या हाती काही दिवसांपूर्वी एक निनावी पत्र आले. या पत्रामध्ये एका मुलीचे छायाचित्र होते. या मुलीची हत्या करून तिला मुस्लिम समाजाच्या दफनभूमित पुरण्यात आल्याचे त्यामध्ये म्हटले ...पान २ वर

## पोटच्या मुलांची तिने केली नाही कीव आईने घेतला दोन चिमुकल्याचा जीव

अलिबाग/क्राईम रिपोर्टर

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' अशा शब्दात भारतीय संस्कृतीत आईचा गौरव केला जातो. पण ९ महिने मुलाला आपल्या उदरात वाढवणारी, काबाड कष्ट करून त्याचे पालनपोषण करणारी जन्मदाती आई आपल्याच मुलांचा बळी घेऊ शकते अशी कल्पनाही कोणी करू शकत नाही. पण आताची आई बदलली आहे. मुलांसाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करणारी आई आता स्वतःच्या सुखासाठी मुलांचा बळी घेत आहे. अलिबागच्या किहीम गावात अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या एका मातेनेच आपल्या दोन मुलांचा जीव घेतला. या घटनेने संपूर्ण अलिबाग तालुक्यात खळबळ माजली असून पोलिसांनी आरोपी आईला अटक केली आहे.

गेल्या आठवड्यात रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे दोन लहान मुलींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. आता या मृत्यूमागचं मोठं धक्कादायक कारण समोर आलं आहे. अनैतिक संबंधात अडथळा ठरत असल्याच्या कारणावरुन जन्मदात्या आईनेच पोटच्या लेकरांचा गळा दाबून त्यांचा खून केल्याची धक्कादायक अशी घटना अलिबाग तालुक्यातील किहिम येथे घडली. पोटचं लेकरु म्हणजे आईच्या काळजाचा तुकडा. लेकराला साधं खरचटलं तरी आईच्या काळजात धस्स होतं. मात्र, जन्मदात्या आईनेच पोटच्या एक नाही तर दोन्ही लेकरांचा जीव घेतला. याप्रकरणी मांडवा सागरी पोलिसांनी आरोपी महिलेला सोमवारी (८ एप्रिल) सायंकाळी ताब्यात घेतले. शितल सदानंद पोले (वय २५) असं आरोपी महिलेचं नाव आहे. अनैतिक संबंधात ही दोन्ही मुलं अडथळा ठरत होती. यामुळे प्रियकरासाठी आईने पोटच्या मुलांनाच संपवलं. आईच्या कृत्याने केवळ अलिबागच नाही तर संपूर्ण रायगड जिल्हा हादरुन गेला. अवघ्या पाच वर्षांची आराध्या सदानंद पोले आणि तीन वर्षाचा सार्थक सदानंद पोले यांची जन्मदाती आईच त्यांचा



कर्दनकाळ ठरेल, याची कल्पनाही कोणी केली नसेल. आईवर मोठ्या विश्वासाने बागडणाऱ्या त्या चिमुकल्यांना केवळ प्रियकरासाठी तिने ठार मारले अशी माहिती पोलिस तपासातसमोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, संशयित आरोपी शितल पोलेचे गावाकडील तरुणासोबत प्रेमसंबंध होते. तिला त्याच्यासोबत संसार थाटायचा होता. मात्र, ही दोन्ही मुलं त्यात अडथळा ठरत होती. प्रियकराला मुलं नको होती. अशातच मुलगी आराध्या आई सतत फोनवर बोलत असल्याचे वडिलांना ...पान २ वर

## मुकबधीर मुलगा विकृताच्या तावडीत गावला गुटख्याच्या पुडीने आरोपीचा मार्ग दावला



नवी मुंबई/एस.कुमार

अप्रकृतिक सेक्स हि एक प्रकारची विकृती आहे. पण समाजात असे वासनांध विकृत असतात. त्यामुळेच लैंगिक अत्याचाराच्या घटना घडतात. तळोजा येथे एका १२ वर्षाच्या मुकबधीर मुलाचे अपहरण करून नंतर त्याच्यावर लैंगिक अत्याचाराची घटना घडली होती. मात्र कोणताही पुरावा नसताना केवळ गुटख्याच्या पुडीवरून पोलिसांनी आरोपीचा शोध घेवून त्याला गजाआड केले.

दिनांक २७ मार्च २०२४ रोजी तळोजा पोलीस ठाण्याचे हद्दीत एका १२ वर्षीय मुकबधीर मुलाचे हात पाय बांधुन तलावातील पाण्यात फेकलेला मृतदेह मिळुन आला होता.या घटनेची माहिती मिळताच डायघर पोलीस ठाण्याचे पथक व गुन्हे शाखेचे सहा. पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे व वपोनि सुनिल शिंदे हे ...पान २ वर

## अतिक्रमित जागेचा वाद प्राणावर बेतला माजी सरपंचाचा विरोधकांनी जीव घेतला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



मयत गजानन

ग्रामीण भागात प्रामुख्याने शेती हाच व्यवसाय असतो. त्यामुळे जमीनच्या तुकड्याला शेतकरी पोटच्या पोरासारखे सांभाळतो. आपल्या मालकीच्या जागेतील एक इंचही जागा सोडत नाही. संग्रामपूर तालुक्यातील कोलाद गावात अतिक्रमित जमिनीवरून गावातीलच तिघांचा माजी सरपंच गजानन देऊळकार यांच्याशी वाद होता. या वादातून त्याने ज्यांच्याशी वाद होता त्यांची पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती. याच गोष्टीचा राग मनात ठेवून विरोधकांनी गजानन देऊळकार यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



आरोपी नितीन ठाकरे



आरोपी ज्ञानेश्वर काळे



आरोपी अमोल म्हसाळ

गावा-गावात किरकोळ कारणातून वादावादीचे प्रसंग उद्भवत असतात. हे वाद वेळच्या वेळी मिटवणे आवश्यक असते. तंटामुक्त समिती हे काम करते, मात्र काही वेळा दोन्ही बाजूकडून वाद मिटवण्यासाठी आवश्यक प्रयत्न होतांना दिसत नाहीत. परिणामी वाद वाढत रहातात आणि त्यातून एखाद्याचा बळी जाऊ शकतो. बुलढाणा जिल्ह्यात एका माजी सरपंच आणि अन्य काही लोकांत तीन गुंठे अतिक्रमित जागेवरून वाद निर्माण झाला होता. या वादातून अनेकदा हाणामारीचे प्रकारही झाले होते. याच्या तक्रारीही पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या, पण तोडगा मात्र निघाला नव्हता. अखेरीस माजी सरपंचांच्या खुनाने या प्रकरणाचा दुर्दैव शेवट झाला. त्यांना मारणारे तिथे तुरूंगात गेले. संग्रामपूर तालुक्यातील तामगांव पोलीस स्टेशनपासून १२ किलोमीटर अंतरावर असलेलं कोलद गाव. या गावात गजानन देऊळकार हे माजी सरपंच ...पान २ वर

## जमिनीच्या वादाला सुडाची धार पुतण्याने केले काकालाच ठार





चंदगड (कोल्हापूर)/क्राईम रिपोर्टर

जमिनीचे वाद भयंकर असतात. या वादात माणूस रक्ताच्या नात्यानाही जुमानत नाही. कोल्हापूर जिल्ह्याच्या हाजगोळी गावात दोन भावांमध्ये जमिनीच्या वाटणीवरून वाद होता. या वादात वसंत पाटील यांच्या भावाचा अल्पवयीन मुलगा सतत वसंत पाटील यांच्याशी वाद घालायचा. त्यामुळे एके दिवशी वसंत पाटील यांनी पुतण्याला मारले. त्याचाच राग मनाशी धरून पुतण्याने आपल्या एका नातेवाईकाच्या मदतीने चुलत्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुका हा शेवटचा तालुका म्हणून ओळखला जातो. हा तालुका तसा ...पान २ वर

## दोन शेजाऱ्यांमधील वाद विकोपाला गेला दारुड्याच्या हातून निष्पाप तरुण मेला





सांगली/क्राईम रिपोर्टर

दारुड्या माणसाच्या नदाला सहसा कोणी लागत नाही. कारण दारूच्या नशेत तो कधी काय करेल याचा नेम नसतो. सांगलीच्या राहुल राजे चौकात किशोर कदम आणि भीमराव गायकवाड या दोन शेजाऱ्यांमध्ये वाद होता. त्यातून त्यांची नेहमी भांडणे व्हायची. दारुडा किशोर कदम सतत दारूच्या नशेत गायकवाड कुटुंबाला शिवीगाळ करायचा. प्रकरण पोलिसांपर्यंत गेले तरी दारुडा किशोर कदम ऐकत नव्हता. एकेदिवशी तो असाच दारू पिऊन गायकवाड कुटुंबियांना शिव्या देत असता गायकवाड यांचा मुलगा प्रतिक बाहेर आला आणि त्याने किशोरला मारहाण केली, याच दरम्यान किशोर कदम याने लोखंडी रॉडचे फटके प्रतीकच्या डोक्यावर मारले. यात गंभीर जखमी झालेल्या प्रतीकला रुग्णालयात नेले. मात्र तिथे त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

किशोर नामदेव कदम हा आपल्या पत्नी मुलासह सांगलीवाडी येथील राहुलराजे चौकात राहयला आहे. त्याच्या शजारीच भीमराव गायकवाड हे पत्नी प्रमिला आणि मुलगा प्रतिक याचेसह राहयला आहेत. या दोघांची घरे एकमेकाला लागून असल्याने दोघात सारखी किरकोळ कारणातून भांडणे होत होती. त्यातच अलिकडे किशोर हा दारू पिऊन आला की, विनाकारण शेजाऱ्यांना त्रास देत होता. अंगणात उभे राहुन दारूच्या नशेत शिव्या देत असायचा. त्यामुळे ...पान ६ वर

## बँकेच्या कर्जावरून दोस्तीत दुष्मनी झाली मित्राने जिवलग मित्राची निर्घृण हत्या केली





इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

मैत्रीत कधीही पैशाचे व्यवहार करू नयेत आणि केले तरी लवकरात लवकर ते मिटवावेत. कारण पैशाच्या व्यवहारत मैत्री तुटते आणि जिवलग मित्र एकमेकाचे शत्रू बनतात. इचलकरंजीत राहुल आणि रोहित यांच्याबाबत असे झाले. राहुलने मैत्री खातर रोहितला स्वतःच्या नावावर बँकेतून गाडीसाठी कर्ज काढून दिले. पण तो बँकेचे हप्ते वेळेवर भरू शकला नाही. त्यामुळे बँकेने गाडी जप्त केली. त्यातून रोहित आणि राहुल यांच्या दुष्मनी झाली आणि याच दुष्मनीतून राहुलने रोहितचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीन अटक केली आहे.

रोहित तडाखे हा लालनगर जवळील जाधव ...पान ६ वर

## प्रियकर प्रेयसीचा शेतात रंगला डाव पतीने दोघांवर घातले कुऱ्हाडीचे घाव





सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

आपली पत्नीचे पर पुरुषांशी अनैतिक संबंध आहेत हे कुठल्याही पुरुषाला सहन होत नाही. त्यामुळे अशा अनैतिक संबंधातून अनेकांना प्राण गमवावे लागलेत. सोलापूरच्या बरुर, नांदणी येथे एका इसमाने त्याच्या पत्नीला तिच्या प्रियकरासोबत नको त्या अवस्थेत पाहताच त्याचा संयम सुटला आणि त्याने आपल्या साथीदाराच्या मदतीने पत्नी व तिच्या प्रियकराची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

आपल्या पत्नीला आणि तिच्या प्रियकराला घरात एकत्र पाहिल्याने संतप्त झालेल्या पतीने आपल्या साथीदारासह पत्नी व प्रियकराच्या मानेवर कुऱ्हाडीने सपासप वार करून निघृण खून केल्याची घटना बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास बरूर नांदणी ता दक्षिण सोलापूर शिवारात घडली आहे. या घटनेमुळे बरुर, नांदणी, टाकळी शिवारात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळतात मंद्रूप पोलिसांनी ...पान ६ वर

15 TO 21 APRIL 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 4/13/2024 7:46 PM Page 1



पान १ वरून...

## सैतान अंगात शिरल्याची समजूत ...

होते. पोलिसांच्या पथकाने गांभीर्याने याप्रकरणाचा तपास सुरू करून दफन केलेला मृतदेह पुन्हा बाहेर काढला. मृत मुलीच्या डोक्यावर कापलेल्या जखमा आढळून आल्या. हा हत्येचा प्रकार असल्याचे पोलिसांना समजल्यानंतर त्यांनी याप्रकरणी मुलीच्या आई-वडिलांना अटक केली आहे. त्यांच्या आणखी एका मुलीची जीभ कापण्यात आली असून तिच्या देखील डोक्यावर जखमा होत्या. दीड वर्षांच्या मुलीच्या हत्येमागील कारणांचा पोलीस शोध घेत आहेत. त्यामुळे हा प्रकार अंश्रद्धेचा असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मुंब्रा येथील शिवाजी नगर भागात मुलगी तिचे वडिल जाहीद शेख (३८), आई नूरानी, दोन भाऊ आणि दोन बहिणींसोबत राहात होती. १८ मार्चला तिचे आई-वडिल तिला मुंब्रा येथील एका खासगी रुग्णालयात घेऊन गेले. तिच्या डोक्याच्या मागील बाजूस, टाळूवर डॉक्टरांना कापल्याच्या काही जखमा आढळून आल्या. या बाबत डॉक्टरांनी तिच्या आई-वडिलांना विचारले असता, त्यांच्याकडून घरामध्ये काही लागल्याचे सांगण्यात आले. डॉक्टरांना त्यांचे म्हणणे पटत नव्हते. त्यानंतर संबंधित डॉक्टरांनी त्या मुलीच्या डोक्याला प्राथमिक उपचार करून तिला उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात दाखल करण्यास सांगितले. तिच्या आई-वडिलांनी तिला दुसऱ्या रुग्णालयात नेले असता, तिथे तिचा मृत्यू झाला. डॉक्टरांनी तिच्या डोक्याला लावण्यात आलेली पट्टी काढण्यास सांगितले. परंतु पालकांनी त्यास नकार दिला. तिच्या मृत्यूनंतर डॉक्टरांचे प्रमाणपत्र त्यांना मिळाले. प्रमाणपत्र दफनभूमित दाखवून त्यांनी मुलीचे प्रेत दफन केले. दरम्यान, काही दिवसांपूर्वी ठाणे पोलीस उपायुक्त परिमंडळ एक या कार्यालयात एक पत्र आले. या पत्रामध्ये एका मुलीचे छायाचित्र होते. या मुलीची हत्या करून तिला मुस्लिम समाजाच्या दफनभूमित पुरण्यात आल्याचे म्हटले होते. पोलिसांनी संबंधित पत्रावर असलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला. परंतु तो मोबाईल क्रमांक बंद होता. तसेच निवासाचा पत्ता देखील होता. हा पत्ता देखील खोटा होता. असे असले तरी छायाचित्र असल्याने मुंब्रा पोलिसांनी या प्रकरणाचा तपास गांभीर्याने सुरू केला. पोलिसांनी तहसिलदारांना पत्रव्यवहार करून दफन भूमित पुरलेला मृतदेह पुन्हा बाहेर काढला. त्यावेळी मुलीच्या डोक्यावर पोलिसांना जखमा आढळून आल्या. पोलिसांनी तात्काळ मुलीच्या पालकांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला दोघांनीही उडवाउडवीची उत्तरे दिली. ऋमुलीचा सांभाळ करता येत नसल्याने तिची हत्या केल्याचे सांगितले. मात्र पोलिसी खाक्या दाखवताच दोघांनी आपला गुन्हा कबूल केला. बाळाच्या ऋअंगात सैतान येत होता. त्यामुळे मुलीची हत्या केल्याचं त्यांनी सांगितलं.ऋ मुंब्रा पोलिसांनी मुलीच्या आई-वडिलांना अटक केली आहे. शेख हा मूळचा झारखंड येथील आहे. काही महिन्यांपूर्वीच तो भाड्याने मुंब्रा येथे राहण्यास आला आहे. त्याच्या एका मुलीची जीभ कापलेल्या अवस्थेत आहे. तसेच डोक्यावर जखमा होत्या अशी माहिती पोलिसांना प्राप्त झाली आहे. त्यामुळे या मुलीसोबत देखील असा प्रकार करण्याचा प्रयत्न केला होता का, यादिशेने पोलीस तपास सुरू आहे.

## मैत्रीत मित्रांचा काहीच नसतो ...

आपल्या मैत्रीणीचेच अपहरण करून नंतर तिची हत्या केल्याची घटना पुण्याच्या विमाननगर भागात घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. विमाननगर परिसरातून अपहरण झालेल्या तरुणीचा खंडणीच्या उद्देशाने खून केल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत असले, तरी तिचे अपहरण करण्यापूर्वीच नगर जिल्ह्यातील कामरगावमध्ये शेतात खड्डा खोदून मृतदेहाच्या विल्हेवाटीची व्यवस्था आरोपींनी केली होती. आरोपींनी एक दिवस आधीच फावडे आणि टिकाव खरेदी केले होते. अपहरणाच्या दिवशीही ते साहित्य आरोपी सोबत घेऊन गेले होते, अशी माहिती तपासात समोर आली आहे. त्यामुळे तरुणीच्या खुनामागे खंडणी हाच उद्देश होता की आणखी काही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाग्यश्री सूर्यकांत सुडे या तरुणीचे ३० मार्चला रात्री अपहरण करण्यात आले. त्याच दिवशी तिचा खून झाल्याचे सात एप्रिलला समोर आले. या प्रकरणी पोलिसांनी तिचा मित्र शुभम फुलावळे याच्यासह आणखी दोघांना अटक केली आहे. कर्जबाजारी झाल्याने खंडणीच्या उद्देशाने भाग्यश्रीचे अपहरण करून खून केल्याचे आरोपींनी कबूल केले, असे विमानतळ पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. मात्र आरोपींनी उलगडलेल्या घटनाक्रमामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत असून, काही गोष्टी लपविण्यात येत असल्याचा संशय निर्माण होत आहे. शुभमने ३० मार्चला रात्री भाग्यश्रीला बाहेर जेवायला जायचे आहे, असे सांगून बोलावून घेतले. त्यानुसार, भाग्यश्री फिनिक्स मॉल येथे शुभमला भेटली. कारमध्ये आणखी दोघे असल्याचे पाहून भाग्यश्रीने त्याच्याकडे विचारणा केली. त्यावर शुभमने ते मित्र असल्याचे सांगितले. त्यानंतर गाडी नगर रस्त्याने घेऊन ते पुढे गेले. वाटेतच त्यांनी भाग्यश्रीचा खून केला, असे पोलिसांनी सांगितले. खून केल्यानंतर भाग्यश्रीच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपींनी बाटलीत पेट्रोलही भरून आणले होते. त्यामुळे तिचा मृतदेह जाळायचा, हे त्यांनी आधीच ठरवले होते अशी शंका निर्माण होते, असे पोलिसांनी सांगितले. मुलीशी संपर्क होत नसल्यामुळे सुडे कुटुंबीयांनी घटनेच्या दुसऱ्याच दिवशी (३१ मार्च) विमानतळ पोलिस ठाण्यात मुलगी हरवल्याची तक्रार नोंदवली. दुसऱ्याच दिवशी तिचे अपहरण झाल्याचे स्पष्ट झाले आणि सातव्या दिवशी तिचा खून झाल्याचे उघड झाले. मुलगी हरवल्यापासून तिचा खून झाल्याचे समजेपर्यंत सात दिवसांचा कालावधी गेला. या सात दिवसांत विमानगर पोलिसांनी काय पावले उचलली असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

## पोटच्या मुलांची तिने केली नाही ...

सांगत होती. अखेर शितलने घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत दोन्ही मुलांच्या नाकातोंडावर कपडा बांधला आणि हाताने तोंड दाबून त्यांचा श्वास कोंडला. तिने मोठ्या शिताफिने मुले झोपेतच बेशुद्ध झाल्याचा कांगावा केला. ३१ मार्चला या मुलांची हत्या करण्यात आली होती. या बालकांच्या मृत्यूमुळे संशय निर्माण झाल्याने त्यांचा विसेरा आणि शवविच्छेदन करुन सोमवारी १ एप्रिला मृतदेह पालकांच्या ताब्यात देण्यात आले. या मुलांच्या पार्थिवावर अंतिम विधी करण्यासाठी त्यांचे नातेवाईक त्यांच्या मूळगावी पुसद-यवतमाळ येथे घेऊन गेले. पोलिस या घटनेचा कसून तपास करीत होते. अखेर एक धागा सापडला आणि पोलिस चिमुकल्यांच्या मारेकऱ्यापर्यंत पोहोचले. याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ लांडे, रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक बी.बी.खाडे यांनी आरोपीला पकडण्यात मोलाची कामगिरी केली.

## मुकबधीर मुलगा विकृताच्या तावडीत ...

पथकासह घटनास्थळी दाखल झाले. या पथकाने पाण्यात फेकून देण्यात आलेल्या बारा वर्षीय मुलाचा मृतदेह तलावातून बाहेर काढून त्याची पाहणी केली. तसेच घटनास्थळी आणखी काही वस्तू मिळतात का ? याचा शोध घेतला असता, घटनास्थळपासून ५० मीटर अंतरावर मुलाची पॅन्ट व एक गुटक्याची पुढी आढळून आली.पोलिसांनी त्या वस्तू ताब्यात घेऊन सविस्तर पंचनामा केला आणि सदर मुलाचा मृतदेह विच्छेदनासाठी रवाना केला. नवी मुंबईत एका १२ वर्षीय मुलाची हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली होती. त्यामुळे सदर गुन्ह्याची गंभीर दखल घेऊन मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा बेलापुर नवी मुंबई यांची दोन पथक तयार करण्यात आली. गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, सपोनि हर्षल कदम, दशरथ विटकर, शशिकांत पवार, श्रीनिवास तुंगेनवार, घेगडमल व महिला सपोनि अलका पाटील यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील पुरावे, मयत मुलगा राहत असलेल्या परिसरातील पाहण्यासाठी आलेल्या संशयीत व्यक्ती व मयत मुलगा राहत असलेल्या परिसरातील लोकांकडे तपास केला. तेव्हा नमुद पथकाला मिळुन आलेल्या माहिती वरून व तांत्रिक तपासावरून या पथकाने संशयीत ८ जणांना मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा बेलापुर नवी मुंबई येथे तपासकामी आणले. त्यांचेकडे या खुनाच्या गुन्ह्याबाबत सखोल तपास केला असता, घटनास्थळावर मिळुन आलेली गुटख्याची पुडी संशयित आरोपी रमजान मोहम्मद शेख (वय २१) रा.ठाकुरपाडा दहिसर तळोजा ता.जि.ठाणे हा खात असल्याचे निष्पन्न झाले. रमजान मोहम्मद शेख याचेकडे घटनास्थळावर मिळुन आलेल्या मुलाच्या मृतदेहा बाबत सखोल तपास केला असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. रमजान मोहम्मद शेख आणि बळीत मुलगा हे दोघेही एकाच परिसरात राहत होते. बळीत मुलगा हा मुखबधिर होता.या संधीचा फायदा घेवून रमजानने आपली हवस पूर्ण करण्यासाठी या बारा वर्षीय मुलाचे अपहरण करून तळोजा पोलीस ठाण्याचे हद्दीत तलावाकडे आणले. या ठिकाणी रमजान याने या मुलावर लैगिक अत्याचार करून त्याची हत्या केली. त्यानंतर मुलाचे हातपाय बांधून त्याचा मृतदेह तलावात फेकून दिला. इकडे मुलगा घरी न आल्याने त्याच्या आईवडिलांनी मुलांचा सगळीकडे शोध घेतला पण तो मिळून न आल्याने शेवटी डायघर पोलीस स्टेशन गाठून त्यांनी मुलगा हरवल्याची फिर्याद दिली. डायघर पोलिसांनी गु.रजि.नं. ६३५/२०२४ भादवि सं. क. ३६३ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला. हा तपास सुरू असताना दिनांक २७ मार्च २०२४ रोजी तळोजा पोलीस ठाण्याचे हद्दीत एका १२ वर्षीय मुकबधीर मुलाचे हात पाय बांधुन तलावातील पाण्यात फेकलेला मृतदेह मिळुन असल्याची माहिती मिळाली. आणि त्यानंतर या गुन्हयाची उकल झाली. आरोपी रमजान मोहम्मद शेख याने शारीरिक सुखाकरीता बारा वर्षीय मुखबधिर मुलाचा खुन केल्याची कबुली दिली आहे. वरिष्ठांचे आदेशान्वये आरोपी रमजान मोहम्मद शेख वय २१ वर्षे यास १ एप्रिल रोजी अटक करून पुढील कारवाईकामी डायघर पोलीस ठाण्याकडे दाखल असलेल्या गु.रजि.नं. ६३५/२०२४ भादवि सं. क. ३६३ अन्वये पुढील तपासकामी ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई, अमित काळे व सहाय्यक पोलीस आयुक्त ( गुन्हे शाखा )अजयकुमार लांडगे यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, सपोनि हर्षल कदम, सपोनि दशरथ विटकर, सपोनि शशिकांत पवार, सपोनि श्रीनिवास तुंगेनवार, सपोनि घेगडमल, सपोनि अलका पाटील, सफौ. मंगेश वाट, मपोहवा. उर्मिला बोराडे, पोहवा नितीन जगताप, शशिकांत शेंडगे, अनिल यादव, महेश पाटील, पोना. सचिन टिके, निलेश किंद्रे, सतिश चव्हाण, पोशि अशोक पाईकराव, नितीन परोडवाड यांनी केली आहे.

## अतिक्रमित जागेचा वाद प्राणावर...

रहातात. त्यांच्या कुटुंबात पाच भाऊ आहेत. पाचही भाऊ आपआपल्या कामात व्यस्त असायचे. त्यांच्या कुटुंबात पाच एकर शेती असून या शेतीत सर्वच भाऊ मेहनत करून उत्पन्न काढायचे. गजानन देऊळकार यांच्या जवळ गावात तीन गुंठे अतिक्रमित जागा होती. त्याच जागेवरून गजानन देऊळकार यांचा नितीन ठाकरे, ज्ञानेश्वर काळे, अमोल म्हसाळ या तिघांसोबत बऱ्याच वेळा वाद झाला होता. बरेच वर्षापासून ताब्यात असलेल्या त्या जागेवर गजानन यांनी जबरदस्तीने ताबा केला असल्याचे या तिघांचे मत होते. त्याच कारणावरून ऑक्टोबर महिन्यात वाद झाल्याने गजानन यांचे भाऊ रमेश देऊळकार यांनी तक्रार दाखल केल्याने तामगांव पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले होते. रमेश देऊळकर यांना शिवीगळ करत गजानन यांना मारून टाकू अशा गर्भित धमक्या देण्यात आल्याहोत्या. शुक्रवार दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजीही गजानन देऊळकार शेतातून रस्त्याने घरीयेत असतांना नितीन ठाकरे, ज्ञानेश्वर काळेया दोघांनी त्यांना 'या गजाननला पकडा याचा खून करू,' असे म्हणत अश्लील शिवीगाळ केली होती, तेंव्हा गजानन देऊळकार यांनी पोलीस स्टेशनला धाव घेऊन तक्रार दाखल केली, त्यानुसार पोलिसांनी अप. क्र. २६/२४ कलम २९४, ५०६, ३५१, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला होता. तेंव्हापासून त्यांच्यात वैर निर्माण झाले होते. गजानन देऊळकर त्या तिघांच्याही मनात सलत होता. नेहमी पोलीस स्टेशनला तक्रार देणाऱ्या गजानन यांना संपवून त्यांना सूड उगवायचा होता, त्यासाठी ते तिघेही संधीच्या शोधात होते. दि. २६ फेब्रुवारीला सायंकाळी कोलद परिसरात वादळवारा, गारपीट व अवकाळी पावसाने तांडव केले. गावकऱ्यांच्या घरावरील टिनपत्रे व घराची पडझड झाली होती. गजानन देऊळकारचे भाऊ प्रल्हादयांचे घरकुलाचे बांधकाम सुरू असल्याने काही नुकसान झाले का? ते पहाण्यासाठी गजानन रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान घराची पहाणी करण्यासाठी गेले. तसेच गावातील एका व्यक्तीच्या घरावरील टिनपत्रे उडाले होते ते पहाण्यासाठी गेले. त्याठिकाणी पूर्ण गाव गोळा झाले होते. तेथे नितीन ठाकरे, ज्ञानेश्वर काळे व अमोल म्हसाळ उपस्थित होते.

गावातील वीजपुरवठा खंडित झाल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. रात्री १० वाजता गजानन गावापासून काही अंतरावर शेतात जात असल्याचे त्या तिघांनीबघितले आणि हीच संधी साधत गजानन यांचा गेम करण्याचे ठरवले. गजानन यांना रस्त्यात अडवून अंधाराचा फायदा घेत नितीन ठाकरे, ज्ञानेश्वर काळे, अमोलम्हसाळ यांनी लाथा-बुक्क्यांनी तुडवले. नंतर काठ्या घेऊन त्यांच्यावर तुटून पडले. काही वेळ गजानन यांनी प्रतिकार केला, पण तिघांच्या हल्ल्यात काठ्यांचे फटके डोक्यावर बसल्याने गजानन जमिनीवर कोसळले. डोक्यातून रक्ताच्या धारा वहात होत्या, पणत्या तिघांची मारहाण सुरूच होती. काठीचे घाव वर्मी लागल्याने काही क्षणात गजानन यांचा मृत्यू झाला. गजानन यांचा मृत्यू झाल्याची खात्री पटताच तिघांनी घटनास्थळावरून पळ काढला. बुधवार दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळचे ७ वाजले असता वेत, कोलद ते माळेगाव दरम्यान असलेल्या कच्च्या रस्त्याखाली खोलगट नालीत कोलद गावचे माजी सरपंच गजानन देऊळकारयांचा मृतदेह पडलेला असल्याची कुजबूज गावात सुरू होती. हळूहळू घटनास्थळावर बघ्यांची तोबा गर्दी जमली. या घटनेची खबर तामगाव पोलिसांना सकाळी साडेसात वाजता देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार आपल्या सहकाऱ्यांसह काही मिनिटात घटनास्थळी पोहचले. पोलिसांना पहाताच बघ्यांची गर्दी पांगत होती. रस्त्यालगत खोलगट भागात गजानन देऊळकार यांचा मृतदेह पडलेला होता. त्यांच्या डोक्यांवर मारहाणीच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. डोक्यातून रक्त निघाल्याचे तसेच दोन्ही पायावर जखमा दिसत होत्या. दोन्ही पाय सुतळीने बांधले असल्याने हा घातपात असल्याची पोलिसांची खात्री पटली. मृतकाचे गावातील नितीन महादेव ठाकरे (देशमुख), ज्ञानेश्वर भास्कर काळे, अमोल ब्रह्मदेव म्हसाळ यांच्या सोबत गावातील अतिक्रमित जागेवरून बरेचदा वाद झाले असून त्यांनी मृतकास जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे पोलिसांना गावकऱ्यांनी सांगितले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी वरवट बकाल येथे हलवला. गजानन देऊळकार यांचे भाऊ प्रल्हाद मोतीराम देऊळकार यांनी तामगांव पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केल्याने पोलिसांनी नितीन महादेव ठाकरे (वय ३२), ज्ञानेश्वर भास्कर काळे (वय २६), अमोल ब्रह्मदेव म्हसाळ (वय ३९) या तिघांवर अप. नं. ५१/२४ कलम ३०२, ३४. भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करून तिघांनाही तात्काळ ताब्यात घेतले. सायंकाळी गजानन देऊळकार यांच्या मृतदेहावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दि. २८ फेब्रुवारी रोजी तिन्ही आरोपींना संग्रामपूर न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने आरोपींना दि. २ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. पोलीस तपासात गावातील अतिक्रमित जागेच्या उफाळलेल्या वादाचे पर्यावसान कट्टर दुश्मनीत झाल्याने माजी सरपंच देऊळकार यांचा तिघांनी निर्घृण खून केल्याचे उघड झाले. काही गुंठे अतिक्रमितजागेच्या क्षुल्लक वादातून गजानन देऊळकार यांची हत्या झाली. काही वर्षाआधी गावातील तंटे गावातच सोडवण्यासाठी तंटामुक्त गाव समिती मोलाची कामगिरी करत होती. आजही तंटामुक्त समित्या कागदावर अस्तित्वात आहेत. तंटामुक्त गाव समितीने परस्पर सामंजस्याने वाद सोडवला असता तर कदाचित एक जीव वाचला असता. कोणत्याही गावात होत असलेला वाद तंटामुक्त समितीने लक्ष देऊन सोडवल्यास पुढील अनर्थ टळतील यात शंका नाही. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद ठाकरे, डी.एम.गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली तामगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदारसहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार, पोलीस उपनिरीक्षक दिपक सोळंके, ए.एस.आय. रामकिशन माळी, पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन गव्हांदे, अशोक वावगे, पोलीस नाईक उमेश बोरसे, पोलीसकॉन्स्टेबल विकास गव्हाळ, मनिष वानखडे करत आहेत.

## जमिनीच्या वादाला सुडाची धार...

कर्नाटकातील बेळगावी जिल्हाला लागून असल्याने जंगलमय भागच आहे. चंदगड तालुक्यातील हाजगोळी येथे वसंत पांडुरंग पाटील हे वयोवृध्द ग्रहस्थ आपली पत्नी यल्लुबाई, मुलगा नंदकुमार याच्याबरोबर राहयला आहेत. त्याची थोडीफार शेतजमीन असल्याने त्या शेतीतील उत्पन्नावरच त्याच्या घराचा प्रंपच चालु होता. हाजगोळी येथील वसंत पाटील याची गावालगतच शेतजमीन आहे. या शेतजमीनीत त्यांनी काजुची बाग केली असल्याने हाळ नावाच्या शेताकडे त्याचे रोज येणे जाणे होते. त्याच्या वडिलार्जीत शेतजमीनीचा वाद त्याच्या भावाबरोबर चालू होता. हा वाद काही केल्या मिटत नव्हता. डोंगराकडील शेतजमीनीच्या समाईक हिस्शावरून वाद असल्याने त्याची भांडणे रोज भावाच्या मुलग्याबरोबर होत होती. त्याच्या भावाचा मुलगा हा अल्पवयीन होता. तो अल्पवयीन असला तरी तो रागीट आणि तापट स्वभावाचा होता. तो भांडणात सारखे काका वसंत पाटील यांना मारायला जात होता. वसंत पाटील यांनी त्याला बऱ्याचवेळेला समजावून सांगितले होते. तु मोठयांच्या भांडणात पडू नकोस. तुला यातील काही कळत नाही. तरी ही तो आपल्या आईच्या सांगण्यावरून त्याच्याशी कायम वाद घालत होता. त्यातच वडिलकीच्या नात्याने वसंत पाटील यांनी त्याला खडसावून दोन तीन वेळा मारले ही होते. त्यामुळे तो काका वसंत पाटील याचेवर चिडून होता. त्याला राग सहन होत नव्हता. कधी तो डोंगराकडील शेतात जनावरासाठी चारा आणायला गेला की तो काका वसंत पाटील याचेवर गुरगुरत होता. तो काही करणार नाही याची वसंत पाटील यांना खात्री होती. त्यामुळे ते बेफिकर होते. परंतु इकडे पुतण्याच्या मनात मात्र कधी एकदा काकांना धडा शिकवितो असे झाले होते. समाईक शेतजमीनीच्या हिस्साचा वाद हा खरा तर मोठया लोकांचा प्रश्न होता. त्यात लहान मुलांनी लक्ष घालू नये असे वसंत पाटील यांना वाटत होते. म्हणून तर त्यांनी आपला मुलगा नंदकुमार याला देखील या वादात पडू नकोस असे सांगितले असल्याने तो या वादात पडत नव्हता. परंतु त्याचा पुतण्या मात्र त्याच्या आईच्या सांगण्यावरून वसंत पाटील यांना बघून घेण्याची भाषा करीत होता. तो आपल्या भावाचा मुलगा असल्याने त्याच्या या धमकीकडे वसंत पाटील हे दुर्लक्ष करीत होते. त्याचे दुर्लक्ष करणे हेच त्यांना महागात पडले. दि.२४ मार्च रोजी वसंत पाटील हे पत्नी यल्लुबाई हिला सांगून हाळ नावाच्या शेतात काजू वेचण्यासाठी जातो असे सांगून सकाळीच घराबाहेर पडले. दुपारपर्यंत ते घराकडे परत आले नाहीत.संध्याकाळ झाली तरी ते परत आले नाहीत म्हणून त्याचा मुलगा नंदकुमार हा त्यांना शोधण्यासाठी काजूच्या बागेत गेला. तेथे ही त्याचा शोध लागला नाही. त्याला काजूच्या बागेत रक्ताचे डाग आणि वडिल वसंत पाटील याच्या चप्पला पडलेल्या दिसल्या. तसेच मारहाणीच्या खुणा ही दिसल्या. त्याने व त्याच्या नातेवाईकांनी त्या रात्री त्याचा बराच उशिरा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाहीत. त्यानंतर त्याने दुसऱ्या दिवशी चंदगड पोलीस स्टेशन गाठून आपले वडिल वसंत पाटील हे काजू वेचण्यासाठी गेले ते परत आले नाहीत ते बेपत्ता झाले असावेत किंवा त्याचा घातपात झाला असावा अशी शंका व्यक्त करून त्यांनी तशी फिर्याद दिली. नंदकुमार पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चंदगड पोलीस त्याचा शोध घेत होते.परंतु तरी ही त्याचा शोध लागत नव्हता. दि.२९ मार्च रोजी जंगमहट्टी ते तुर्केवाडी दरम्यान असणाऱ्या हांजहोळी नदीच्या बंधाऱ्यात पोहयला गेलेल्या काही लोकांना एका इसमाचा मृतदेह अडकलेला दिसला.त्यांनी या घटनेची माहिती चंदगड पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलीसांनी काही ग्रामस्थांच्या मदतीने बंधाऱ्याच्या पाण्यात अडकलेला मृतदेह बाहेर काढला. दोन तीन दिवस झाल्याने तो मृतदेह कुजत चालला होता. पोलीसांनी निरखून पाहणी केली असता त्याचा गळा चिरला असल्याचे दिसत होते. तर अंगावर मारहाणीच्या खुणा दिसत होत्या. याचा अर्थ त्या इसमाचा खून करून तो मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने बंधाऱ्यात आणून टाकल्याचे पोलीसांनी ओळखले. पोलीस या घटनेचा पंचनामा करीत असताना तो मृतदेह कोणाचा आहे हे ओळखणे महत्वाचे असल्याने त्यांनी मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम चालू केले. घटनास्थळी पोलीसांनी नंदकुमार पाटील यांना बोलावून घेतले त्याने हा मृतदेह आपले वडिल वसंत पाटील याचा असल्याचे ओळखले. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी मयताचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी चंदगड येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देवून तपासाला सुरूवात केली. ही घटना घडुन ८ ते १० दिवस झाले तरी या घटनेतील संशयीत आरोपीचा माग पोलीसांना सापडत नव्हता.या घटनेचा तपास चंदगड पोलीसाबरोबरच स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांना माहिती मिळाली की, मयत वसंत पाटील याचा शेतजमीनीचा वाद हा त्यांचा अल्पवयीन पुतण्याबरोबर होता.त्याची आणि त्याची या कारणातून सारखी भांडणे होत असल्याची ही माहिती मिळाली. त्यातच त्याचा तो अल्पववयीन पुतण्या हा घटनेनंतर हाजगोळी येथे नव्हता. तो गाव सोडून आपल्या आत्याचा मुलगा गणेश परशुराम झंगरूचे याच्याकडे गेला आहे.झंगरूचे हा बेळगावी तालुक्यातील सोनोली येथे राहयला असल्याचे समजल्यावर पोलीसांनी तेथे जावून त्या दोघांना संशयावरून ताब्यात घेतले.त्यांना चंदगड पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता वसंत पाटील याच्या खूनाविषयी धक्कादायक अशी माहिती मिळाली. दि.२४ मार्च रोजी वसंत पाटील हे डोंगराकडील शेतात काजू वेचण्यासाठी गेले असता त्यावेळी त्याचा अल्पवयीन पुतण्या ही त्या शेतात जनावरासाठी चारा नेण्यासाठी आला होता. सकाळी सकाळीच त्यावेळी त्याने आपल्या काकाबरोबर समाईक शेतजमीनीच्या हिश्यावरून वाद घातला. पुतण्या आपल्याशी भांडत आहे हे बघून वसंत पाटील यांनी त्याला तु येथून जा नाही तर बघ असे सांगितले. तो काही त्याचे ऐकायला नाही. वसंत पाटील हे कामु वेचण्याचे काम करीत असताना त्याच्या पुतण्याने मागून येवून रागाच्या भरात त्याच्या डोक्यात लाकडी दांडका जोरात हाणला. त्यासरशी वसंत पाटील हे ओरडतच खाली पडले.ते खाली पडल्यावर त्याचा पुतण्या एवढयावरच थांबला नाही त्याने शेतातील झोपडीतून चाकू आणला आणि त्या चाकूने जोरात त्याचा गळा चिरला. त्यासरशी वसंत पाटील हे रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडले. त्याने त्याचा खून केला.आता त्याच्या डोक्यात त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची याचा विचार येत होता. म्हणून त्याने त्याचा मृतदेह एका पोत्यात कोंबला आणि ते पोते झोपडीत ठेवून तो लगेच आपली दुचाकी गाडी घेून आत्याचा मुलगा गणेश झंगरूचे याच्याकडे सोनोली येथे गेला. त्याला घडलेली सगळी हकीकत सांगितली. त्यावेळी गणेश झंगरूचे याने आपली चार चाकी गाडी काढली. परत ते हाजगोळी येथे आले. त्यांनी पोत्यात भरलेला वसंत पाटील याचा मृतदेह गाडीत ठेवला. ते गाडी घेऊन निर्मनुष्य रस्त्याने जंगमहट्टी तुर्केवाडी दरम्यान आले. रात्रीच्या अंधारात त्या दोघांनी त्याचा मृतदेह हांजहोळ नदीच्या बंधाऱ्यात टाकला. तेथून परतताना त्यांनी मयत वसंत पाटील दुचाकी गाडी बहादरवाडी किणयेजवळ एका ठिकाणी सोडली. तर त्याचा मोबाईल फोन हा कोवाड येथील एका छोटया पुलाच्या खाली टाकला. मृतदेहाची आणि त्याच्या सामानाची विल्हेवाट लावून दोघे ही आपआपल्या घरी परतले.दोन दिवसांनी सगळ्या घटनेला जवळून बघून आता आपल्यां अंगावर काही येत नाही असे समजून अल्पवयीन पुतण्या हा परत बेळगावी जवळील सोनोली येथे गेला. त्यांनी सांगितलेला घटनाक्रम ऐकून पोलीस ही आवाक झाले. या घटनेची फिर्याद मयत वसंत पाटील याचा मुलगा नंदकुमार पाटील याने चंदगड पोलीसात दिली असल्याने पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून वसंत पांडुरंग पाटील (वय ६५) यांचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी त्याचा अल्पवयीन पुतण्या आणि नात्यातील गणेश परशुराम झंगरूचे (वय २६) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना पोलीसांनी चंदगड येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने अल्पवयीन पुतण्याची रवानगी बालसुधारगृहात तर गणेश झंगरूचे याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू लाकडी दांडका आणि गुन्हयात वापरलेली दुचाकी आणि चार चाकी गाडी जप्त केली. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक महेंद्र पंडित, निकेश खाटमोडे पाटील रामदास इंगवले याच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस निरी.रविंद्र कळमकर, पोलीस उप.निरी.शेष मोरे चंदु नन्नवरे, अमोल कोळेकर, राजु कांबळे, समीर कांबळे, अमित सर्जे, महेश गवळी आणि त्याच्या सहकार्यांनी करून यातील संशयीतांना कोणताही पुरावा नसताना आणि धागा दोरा नसताना जेरबंद केले. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.विश्वास पाटील हे करीत आहेत. भाऊबंदात शेतजमीनीचा वाद हा वेळीच मिटवून घेतले तर पुढील अनर्थ ठळतो. नाही तर रक्ताच्या नात्याचा ही मुडदा पडायला वेळ लागत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

## तेढ निर्माण होणारी पोस्ट व्हायरल केल्याचा गुन्हा

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे एकाने दोन धर्मात तेढ निर्माण होईल, अशी व्हॉटसपवर व्हिडीओ पोस्ट टाकली. या प्रकरणी वलांडी परिसरात दोन तास तणाव निर्माण झाला होता. गुरुवारी (दि. ११ एप्रिल) देवणी पोलिस ठाण्यात संबंधितावर गुन्हा नोंद केल्यानंतर तणाव निवळला. गुरुवारी सकाळी साडेबारा वाजेच्या सुमारास वलांडी येथे आरोपीने त्याच्या स्वतःच्या मोबाइलवर अन्य आयडीवरुन व्हीडीओ स्टेटसवर दोन धर्मात तेढ निर्माण होईल असे स्टेटस ठेवून ते प्रसारीत केले. याची माहिती मिळताच या परिसरात ही पोस्ट वेगाने व्हायरल झाली. देवणी पोलिसांनी संबंधितात ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेश गोरख लामतुरे यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा नोंद झाला.

# भिवंडीत दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीला केले जेरबंद, गावठी कट्टा जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस गस्त वाढलेली असतानाही भिवंडी शहरात गुन्हेगारी च्या घटना काही कमी होत नाहीत .निजामपूरा पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीतील तिघा जणांना अटक केली असून त्यांच्या जवळून गावठी कट्टा जिवंत काडतूस सुरा अशी हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. तर अंधाराचा फायदा घेऊन दोन गुन्हेगार पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार निजामपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही गुन्हेगार ऑटो रिक्षातून संशयित पणे फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष अव्हाड व पोलीस निरीक्षक दिपक शेलार (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जगदीश गिते तसेच अंमलदार सुशिलकुमार धोत्रे, निळकंठ खडके, इब्राहिम शेख, सांबरे यांनी पहाटे चार वाजताच्या सुमारास कांबे रस्त्या वरील तळवलीनाका परिसरांतील तलावाच्या बाजुला पाळत ठेवली असता तेथुन अंधारातुन एक संशयित ऑटो रिक्षा क्रमांक MH 04 KX 7163 तेथुन भरधाव वेगाने जाताना दिसली. पोलिसांनी रिक्षा थांबवण्याचा प्रयत्न केला.परंतु ती भरधाव निघून जाताना काही अंतरावर पोलिसांनी पाठलाग करून रिक्षा थांबवली. त्या वेळी दोन संशयित अंधाराचा फायदा घेऊन तेथून पलायन करण्यात यशस्वी झाले तर नईम जमाल अहमद सय्यद, वय १९ वर्षे, सुफियान भद्रेआलम अन्सारी, वय १९ वर्षे, सोहेल सनाउल्ला शेख, वय २६ वर्षे या भिवंडी शहरात राहणाऱ्या तिघा संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्या अंगझडतीत एक गावठी कट्टा, एक जिवंत काडतूस, एक एअर गन, सुरा, मिरची पावडर असे साहित्य आढळून आल्याने या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. विशेष म्हणजे या तिघा सराईत गुन्हेगारां वर विविध पोलिस ठाण्यात अनेक गुन्ह्यांची नोंद असून सुफियान अन्सारी यास १२ मार्च पासून हद्दपार केले आहे, असे असताना हे सराईत गुन्हेगार दरोडा घालण्याच्या तयारीत भिवंडी शहरात फिरत असल्या बद्दले आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील ४८ आदिवासी संघटना एकवटल्या

**पालघर/प्रतिनिधी**

आपल्या समाजाचे आधी सरकारने तुकडे केलेत त्यांनतर राजकीय पक्षांनी तुकडे केले आहेत. संपूर्ण आदिवासी समाज एक राहिला तर आपण सरकारला निर्णय घ्यायला भाग पाडू शकतो. त्यासाठी आदिवासी समाजासाठी झोकून देणारे आमदार खासदार निवडून पाठवले पाहिजेत. पालघर लोकसभा निवडणुकीसाठी पालघर जिल्ह्यातील ४८ संघटनांचा एक प्रतिनिधी उमेदवार म्हणून उभा करण्याची तयारी केली पाहिजे असे विचार काका धोदडे यांनी वेती येथे बुधवारी पार पडलेल्या संयुक्त आदिवासी हक्क व संरक्षण समितीच्या सभेत घेतले. सभेस उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिल्यामुळे पालघर लोकसभा निवडणुकीचे चित्र रंगतदार पाहायला मिळणार आहे.



पालघर आदिवासी जिल्हा होऊनही १७ संवर्गातील पदांची भरती झालेली नाही, तलाठी, वन विभाग, डी एड/ बी.एड पात्र अपात्र शिक्षकांना भरती करू शकले नाहीत. धानिवरी, पारसी डेअरी, येथील घटनांमध्ये आदिवासी समाजाला न्याय मिळत नाही.पालघर जिल्हा झाल्यानंतरही बिंदू नामावलीत सुधारणा झाली नाही. पालघर जिल्ह्यात आदिवासी महिला तसेच आदिवासी आश्रमशाळा मध्ये आदिवासी मुलींवरील अत्याचाराच्या घटना थांबलेल्या नाहीत. आदिवासी आश्रम शाळांमध्ये पुरवण्यात येणाऱ्या भोजन ठेक्यात ठेकेदाराची लूट, भ्रष्टाचार थांबलेला नाही. आदिवासी जागा मालकावर अत्याचाराच्या घटना थांबलेल्या नाहीत. या सारखे असंख्य आदिवासी प्रश्न आदिवासी लोकप्रतिनिधी सोडवू शकले नाहीत. आदिवासी नेत्यांना पक्षांची बंधने येतात. त्यामुळे राजकीय पक्षांना बाजूला ठेवून आपण पालघर जिल्ह्यातील ४८ आदिवासी संघटनांचा एक उमेदवार लोकसभा निवडणुकीत उतरवू असा निर्णय यावेळी घेण्यात आला. पालघर, वसई, वाडा,जव्हार, मोखाडा, डहाणू, तलासरी, विक्रमगड येथील सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी उमेदवार म्हणून मोहन गुहे, भास्कर दळवी यांनी आपली इच्छा व्यक्त केली. येत्या काही दिवसात संघटना आपला उमेदवार देऊ असे मत आदिवासी हक्क व संरक्षण समितीचे कार्याध्यक्ष माधव लीलका यांनी मांडले. यावेळी डॉ.सुनिल पऱ्हाड, भास्कर दळवी, राहुल धूम, वसंत भसरा, अशोक भोईर, ॲड. विराज गडग, मिनाताई धोदडे, प्रकाश पाटकर, प्रसाद पर्हाड, श्यामसुंदर चौधरी, परशुराम चावरा, तांबडी, मोहन गुहे, अशोक शिंगडा, विलास वांगड, निलेश कासट, माधव तल्हा यासह अनेक संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पोमण येथे अनधिकृत बांधकामाची भिंत कोसळून एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी



**वसई/प्रतिनिधी**

वसई पूर्वेच्या पोमण येथे अनधिकृत गोदामाचे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका तरुण कामगाराचा मृत्यू झाला तर त्याचा भाऊ गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी नायगाव पोलिसांनी ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नायगाव पूर्वेच्या साष्टीकर पाडा येथे एका अनधिकृत गोदामाचे बांधकाम सुरू होते. यावेळी अकरा मजूर काम करत होते. अचानक गोदामाची भिंत कोसळली. या दुर्घटनेत दोन कामगार ढिगार्याखाली कोसळले. त्यामध्ये आकाश टिकोरीलाल गौतम (२१) या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याचा चुलत भसियानंद गौतम हा जखमी झाला. त्याच्यावर सातिवली येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ठेकेदार प्रभू कडव याने कामगारांना कुठल्याही सुरक्षेची साधने पुरवली नव्हती. त्यामुळे त्याच्यावर नायगाव पोलीस ठाण्यात कलम ३०४ अ, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे बांधकाम अनधिकृत असून त्याची शहानिशा करण्यासाठी आम्ही ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसिलदारांकडे तक्रार केली आहे अशी माहिती या प्रकरणाचे तपास अधिकारी महेश बोडके यांनी दिली.

# पालघरच्या धरणांमध्ये निम्म्याहून कमी पाणीसाठा

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील वाढत्या तापमानामुळे धरणांमधील पाणीपातळी कमी होत चालली आहे. त्यामुळे पुढील तीन महिने पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना पाटबंधारे विभागाला आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. शिवाय पाणीसाठा कमी होत राहिला तर पाणीकपातीचे संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पालघर जिल्ह्यातील धामणी, कवडास, वांद्री ही प्रमुख धरणे असून त्यांची एकूण ३२२.२४८ दलघमी क्षमता आहे. २ एप्रिलपर्यंत तिन्ही धरणांत १५६.७९२ दलघमी पाणीसाठा शिल्लक होता. धामणी धरणात ४७.६३ टक्के, कवडास धरणात ४४.७८ टक्के, तर वांद्री धरणात ५७.९६ टक्के पाणीसाठा आहे. याव्यतिरिक्त मनोर, माहीम-केळवा, देवखोप, रायतळे, खांड, देवखोप आणि मोह खुर्द हे बंधारे आहेत. जिल्ह्यातील सूर्या धरण प्रकल्पातील धामणी आणि कवडास धरणातून वसई-विरार महापालिकेसह डहाणू, बोईसर, पालघर परिसर अदाणी औष्णिक वीज प्रकल्प, तारापूर अणुऊर्जा प्रकल्प आणि एमआयडीसी यांसारख्या मोठ्या उद्योगांना पाणीपुरवठा केला जातो. सोबतच जिल्ह्यातील अन्य लहान धरणांवर गावपाड्यांतील पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत. रब्बी हंगामात सूर्या आणि वांद्री धरण प्रकल्पातून डहाणू, पालघर तालुक्यातील पाच हजारपेक्षा जास्त हेक्टरवरील शेतीला सिंचनाचे पाणी पुरविले जाते. मागील वर्षी एक जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत पालघर जिल्ह्यात २६९१.९ मिमी पावसाची नोंद झाली होती. जिल्ह्यात चार महिन्यांत सरासरी २३०९.४ मिमी पाऊस पडतो, मात्र २०२३ मध्ये सरासरीपेक्षा अधिक ११६.६ टक्के पावसाची नोंद झाली होती. मागील वर्षी नैऋत्य मान्सूनचे उशिरा आगमन झाल्याने जूनमध्ये फक्त ५५७.२ मिमी पावसाची नोंद झाली होती. जुलैमध्ये सर्व कसर भरून काढत तब्बल १५०१.६ मिमी विक्रमी पावसाची नोंद केली होती. त्यानंतर संपूर्ण ऑगस्टमध्ये पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांसह सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले होते, मात्र सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस झाल्याने सर्व धरणे काठोकाठ भरून १०० टक्के पाणीसाठा निर्माण झाला होता.



**धरणातील सद्य:स्थितीतील पाणीसाठा**

| धरणाचे नाव | पाणीसाठा | टक्केवारी |
|---|---|---|
| धामणी | १३१.६२८ | ४७.६३ |
| कवडास | ४.४६० | ४४.७८ |
| वांद्री | २०.७०४ | ५७.६१ |
| मनोर | ०.९७९ | ३९.४० |
| माहीम-केळवा | १.७३२ | ५३.४२ |
| देवखोप | १.३७० | ४१.७० |
| रायतळे | ०.६४४ | ३४.३५ |
| खांड | २.४१५ | ५३.६७ |
| मोहखुर्द | ११.७४० | ३६.५९ |

## भिवंडीत विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीकरीत काढली नववर्षाच्या स्वागताची शोभायात्रा!



**भिवंडी/प्रतिनिधी**

चैत्र पाडवा अर्थातच गुढीपाडवा सर्वत्र उत्साहात साजरा केला जात असताना भिवंडी शहरात विविध संस्थांकडून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थाध्यक्ष विजय जाधव, उपाध्यक्षा अरुणा जाधव, श्रीराम भोईर मुख्याध्यापक सुधीर घागस यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या शोभायात्रेत पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शेठ जुगीलाल पोद्दार इंग्लिश मिडीयम स्कूल व विद्याश्रम मराठी शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी माजी विद्यार्थी यांसह हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. या शोभायात्रेचे शुभारंभ केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या शुभहस्ते नारळ वाढवून करण्यात आला. लेझिम पथक ढोलताशा पथक यासोबत ग्रंथ दिंडी, वृक्ष दिंडी यांसह मतदान जनजागृती करणारे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. पद्मानगर येथे या शोभायात्रेचे भव्य स्वागत स्वाभिमान सेवा संस्थेच्या वतीने संतोष शेट्टी यांनी थंडगार फ्रुटीचे वितरण करून करण्यात आले.

# अमृत संजिवनी हेल्थ केअर ॲन्ड सोशल सेंटरतर्फे बाराशेवे आरोग्य शिबीर



**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेला गेली अनेक वर्षे सातत्याने आरोग्य शिबिराचे एकट्याच्या पुढाकाराने सामान्य जनतेला आरोग्याची सेवा विनामूल्य देण्यासाठी दिपक वोरा यांनी आपल्या अमृत संजिवनी हेल्थ केअर ॲन्ड सोशल सेंटरतर्फे नालासोपारा पूर्वेला ओसवाल नगरी येथे साईबाबा मंदिरात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ पत्रकार उमाकांत वाघ हे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. यावेळी वसई कोर्टातील सरकारी वकील किरण म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते राजेश बक्षी व योगा प्रशिक्षण देणाऱ्या प्रियांशी यांचा उमाकांत वाघ यांच्याहस्ते सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बॉडी चेकअप, डायबेटिस, रक्तदाब अशा आजारांवर तपासणी करुन उपचार करण्यात आले. वोरा हे नागरीकांना ऑनलाईन रेशनिंग कार्ड देणे, मोठ्या शस्त्रिया गरीब गरजू नागरीकांना विनामूल्य करुन देणे, आयुष्यमान भारत कार्ड मिळवून देणे, महानगर पालिकेचे ज्येष्ठ नागरीकांना बसेसचे पासेस देणे, पालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकडून अपंग कल्याण खात्याच्या विविध योजनांचा लाभ देणे, सुशिक्षित महिलांना रोजगार मिळावा म्हणून रिक्षा चालविण्याचे २१ दिवसाचे प्रशिक्षण, रिक्षा भरारी प्रकल्प राबविणे असे अनेक जनहिताची कामे करतात. परिसरातील अनेक रुग्णालय व डॉक्टर त्यांना या मोहिमेत सहकार्य करतात. यावेळी त्यांनी रक्तदान शिबिरेही आयोजित केले होते. आत्तापर्यंत त्यांनी ९० रक्तदान शिबिरे आयोजित केली आहेत. त्यांना साथ देणारे विरारचे सामाजिक कार्यकर्ते राजेश बक्षी यांनी आजवर १०६ वेळा रक्तदान केले आहे. तर ७० वेळा स्वत: रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. पत्रकार उमाकांत वाघ यांनी आरोग्य सेवेच्या त्यांच्या या कार्याचे कौतुक केले. ज्येष्ठ पत्रकार उमाकांत वाघ यांना महाराष्ट्र शासनाचा समाज कल्याण खात्याच्या सामाजिक न्याय विभागाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार राज्य शासनातर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत देण्यात आला. पालघर जिल्ह्यात हा पुरस्कार मिळविणारे उमाकांत वाघ हे एकटे सामाजिक कार्यकर्ते आहेत म्हणून त्यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# काशीद कोपर येथे अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या चार बोटी जप्त



**विरार/प्रतिनिधी**

वसई विरारच्या किनारपट्टीवर पुन्हा वाळू माफिया सक्रिय झाले आहेत. मंगळवारी जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि भरारी पथकाने संयुक्त कारुई करून विरार जवळील काशीद कोपर येथे अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या एकूण ४ बोटी जप्त केल्या. नंतर या बोटी आणि सक्शन पंप जिलेटीनच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या. वसई विरार बहुतांश भाग हा किनारपट्टीचा परिसर आहे. विरार जवळील भागात वैतरणा व शिरगाव, नारिंगी खाड्यामध्ये छुप्या मार्गाने सक्शन पंप लावून वाळू उपसा होत असतो. या भागत वाळू माफिया पुन्हा सक्रिय झाले आहेत. मंगळवारी खनिकर्म अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकमे काशिदकोपर किनाऱ्यावर छापा घातला. कारवाईची कुणकुण लागताच वाळू माफिया फरार झाले. मात्र पथकाने अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या ४ बोटी जप्त केल्या. या ४ बोटी आणि वाळू उत्खनन करण्यासाठी वापरला जाणारा सक्शन पंप जिलेटीनच्या सहाय्याने स्फोट करून नष्ट करण्यात आल्या. भरारी पथकातील जिल्हा खनिकर्म अधिकारी संदीप पाटील, अधिकार शुल्क निरीक्षक मारोती सुर्यवंशी, मंडळ अधिकारी सुशांत ठाकरे विजयकुमार मींड, विलास पाटील, अनिकेत काळेल आदींच्या पथकाने ही कारवाई केली. या किनारपट्टीच्या लगत व खाडी किनारी मोठ्या प्रमाणात कांदळवनांची वृक्ष आहेत. यामुळे किनाऱ्यावरील जैवविविधता व पर्यावरण संतुलन होण्यास मदत होते. मात्र मागील काही वर्षापासून या किनारपट्टी लगत मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळू उपसा केला जाऊ लागला आहे. याचा मोठा परिणाम हा विविध भागावर होऊ लागला आहे. विरार जवळील वैतरणा खाडीतही मागील काही वर्षांपासून छुप्या मार्गांने बेकायदेशीर वाळू उत्खनन केले जाते. याचा परिणाम हा खाडीत व खाडी किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रावर होऊ लागला आहे. सक्शन पंप लावून हे उत्खनन होत असल्याने हळू हळू खाडी जवळील भाग खचू लागला आहे.

## सिने कलाकार संस्थेच्या कोकणप्रांत अध्यक्ष पदी विजय देसाई



**नालासोपारा/प्रतिनिधी**

पत्रकारिता तथा सामाजिक क्षेत्रात आपला विशेष ठसा उमटविणारे वसई तालुक्यातील पत्रकार विजय देसाई यांची सिने-टेली कलाकार संस्थेच्या कोकणप्रांत अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र पाटील सचिव डॉ.वैष्णवी बुटे, सुप्रिया घाडीगांवकर यांनी नियुक्ती केल्याचे पत्र दिले आहे. आपण संघटनेच्या हितासाठी व कलाकारांना न्याय मिळवून देण्यासाठी भरीव योगदान देऊ अशी प्रतिक्रिया विजय देसाई यांनी दिली. या प्रसंगी अध्यक्ष नरेंद्र पाटील, कलाकार मनीष राऊत आदी कलाकार मंडळी उपस्थित होते,देसाई ह्यांच्या नियुक्ती मुळे कलाकार मंडळीत उत्सवाचे वातावरण असून देसाई यांचे अभिनंदन करण्यात आले.

## ईद सणानिमित्त रस्त्यावरील नमाज पठण बंद; मिरारोड मधील मुस्लिम समाजाचा निर्णय




**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

ईद निमित्त रस्ता अडवून नमाज अदा करण्याची प्रथा यंदा मोडीत काढत मिरारोडच्या मुस्लिम बांधवानी नवा आदर्श ठेवला आहे. ईदची नमाज अदा करण्यासाठी सर्व मशीदीमध्ये दोन किंवा तीन भागात जमातीची सोय करण्यात आली आहे. मिरा रोड येथे मोठ्या संख्येने मुस्लिम नागरिक राहतात शहरात जवळपास दोनशेहुन अधिक मशीदी आहेत. सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना पूर्ण झाला असून आज ईदचा सण आहे. त्यामुळे ईदची नमाज अदा करण्यासाठी मशीदीत एका ठराविक कालावधीत जमातची सोय केली जाते.

ईद हा मुस्लिम समाजासाठी सर्वात मोठा सण असल्यामुळे यादिवशी प्रार्थना करणाऱ्या नागरिकांची संख्या ही दैनंदिन प्रार्थना करणाऱ्यांच्या तुलनेत कित्येक पटीने जास्त असते. त्यामुळे मशीदच्यामध्ये खूप गर्दी होऊन नाईलाजाने बहुतांश नागरिक रस्त्यावरच बसून प्रार्थना करतात. मात्र यामुळे वाहतूक कोंडी सारखे प्रश्न उभे राहते आणि त्यावर टीका होत असते. त्यामुळे ही समस्या कायमची दूर करण्यासाठी मिरा रोड येथे राहणारे माजी आमदार मुजफर हुसेन यांच्या पुढाकाराने सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. यात सर्व मशीद मधील इमामाना(मशीद मधील धर्मगुरु) त्यांनी एकत्र आणून ईदसाठी असलेल्या जमाती मध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ईदची प्रार्थना करण्यासाठी दोन ते तीन जमात मिळत असल्याने नागरिक देखील आपल्या सोयीने नमाज पठण करण्यासाठी मशीदमध्ये येऊ लागले आहेत. यामुळे एकाच वेळी मशीद मध्ये होणारी गर्दी कमी झाली असून रस्त्यावर बसून नमाज पठण करण्याची प्रथा देखील पूर्णतः मोडीत निघाली आहे. मुस्लिम बांधवानी उचललेल्या सकारात्मक पाऊलाचे संपूर्ण शहरात कौतुक होत आहे. गुरुवारी ईद निमित्त मिरा रोडच्या अल शम्स या जामा मशीद मध्ये सकाळी सातच्या सुमारास पहिली जमात होती. यावेळी शहरातील मुस्लिम बांधवाना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड हे आपल्या इतर अधिकाऱ्यांसह उपस्थितीत होते. यावेळी गायकवाड यांनी नमाज पठण करण्यासाठी आलेल्या नागरिकांना गुलाबाचे वाटप केले.

# जिकडे लक्ष्मीची पावले तिकडे तारणहार धावले!

राजकारणी लोक मोठे हुशार असतात. त्यांना कधी कोणाशी जुळवून घ्यायचे आणि कधी कोणाला विरोध करायचा, हे पक्क ठाऊक असतं आणि सरशी तिकडे फरशी अशी एक म्हण आहे आणि ती इथल्या राजकारण्यांना पूर्णपणे लागू आहे. गेल्या दीड दोन वर्षापासून, महाराष्ट्रात असाच प्रकार सुरू आहे. जे लोक आपली बेनामी संपत्ती वाचवण्याची धडपड करतायेत, ज्यांच्या मागे इडीचां सासेमिरा लागला आहे. ज्या लोकांना सत्ते सोबत राहून आपले राजकीय भवितव्य उज्वल करायचे आहे, असे लोक आज भाजपाकडे जात आहेत. आणि भाजपा सुद्धा अशा लोकांसाठी पायघड्या अंथरत आहे. या निवडणुकीच्या काळात बरेच लोक भाजपासोबत गेले. त्यातील काही लोक पूर्वी मोदींचे विरोधक होते. मोदींच्या चुकीच्या धोरणांवर बोट ठेवून भाजपाला सातत्याने विरोध करत होते. मग तो नोट बंदीचा निर्णय असो की जीएसटीचा निर्णय असो ज्यांनी मोदींच्या त्या निर्णयावर टीका केली. आज त्याच लोकांनी मोदींमध्ये असे काय पाहिले की त्यांनी मोदींना पाठिंबा दिलाय. राज ठाकरेंच्या मनसेची ओळख मराठी माणसांची तारणहार असलेली संघटना अशी होती. परंतु आता मात्र ती ओळख पुसली गेलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी किंवा महाराष्ट्रासाठी असे काय केले आहे की, ज्यामुळे प्रभावित होऊन राज ठाकरेंनी त्यांना बिनशर्त पाठिंबा दिला, असा प्रश्न आज प्रत्येक मराठी माणसाला पडलेला आहे. काही लोक तर असा आरोप करीत आहेत की, जिकडे लक्ष्मीची पावले तिकडे तारणहार धावले! आता हे खरं किती आणि खोटं किती हे त्यांनाच ठाऊक. पण राज ठाकरेंच्या या निर्णयाने महाराष्ट्रातल्या प्रत्येक मराठी माणसाला फार मोठ्या वेदना झाल्यात. याचे कारण मोदी आणि त्यांच्या भाजपाने महाराष्ट्रासाठी काहीही केलेले नाही. उलट महाराष्ट्रातले जुने पक्ष फोडून, सरकारे बनवली. ते पक्ष कसे फोडले? त्यामागे काय राजकारण होते? कोणाकोणाला तपास यंत्रणांकडून कशाप्रकारे भीती दाखवण्यात आली. हे संपूर्ण महाराष्ट्राला ठाऊक आहे. आणि असे असताना मोदींसाठी बिनशर्त पाठिंबा! आता हसावे कि रडावे तेच कळत नाही. मोदींच्या गुजराती लोकांनी आज संपूर्ण मुंबईचा ताबा घेतलेले आहे. मुंबईला तोडण्याचे कारस्थान दिल्लीतून केले जात आहे. आता इकडचे भट बामन किती जरी सांगत असले, की महाराष्ट्र तोडण्याची विरोधकांची भाषा ही केवळ एक अफवा आहे, तरी ते खरं नाही. महाराष्ट्र तोडण्याचे आणि महाराष्ट्रापासून मुंबईला वेगळा करण्यासाठीच मराठी माणसांची ताकत क्षीण केली जातेय. त्यासाठी फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. राहता राहिला सवाल मोदींच्या विश्वासार्हतेचां! त्यांनी म्हणे भ्रष्टाचार विरोधी मोहीम चालवली आहे. भोपाळच्या भाजपा मेळाव्यात मोदींनी राष्ट्रवादीच्या भ्रष्टाचाराचा उल्लेख केला होता. त्यानंतर ४८ तासात भ्रष्टाचाराचे महामेरू असलेले अजित पवार भाजप सोबत गेले. आणि भाजपवाल्यांनी त्यांना उपमुख्यमंत्री केले. अजित दादांवर शिखर बँकेत २५ हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. शिवाय सिंचन योजनेत ७० हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. हेच भाजपवाले अजित दादांच्या विरुद्ध गाडीभर पुरावे असल्याचा दावा करत होते. मग आज त्याच अजित दादांच्या मांडीला मांडी लावून कसे बसले? आणि भ्रष्टाचाराची मोहीम चालवणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अजित दादांच्या उमेदवारांचा कोणत्या तोंडाने प्रचार करणार आहेत? एकीकडे भ्रष्टाचार विरोधी मोहिमेच्या वल्गना करायच्या आणि दुसरीकडे सगळ्या भ्रष्टाचारांना आपल्या पक्षात घ्यायचे. हीच का मोदींचे विश्वासहारता? आणि याच विश्वास हरतेवर विश्वास ठेवून, मराठी माणसाचे तारणहार महायुतीला पाठिंबा देत आहेत असे म्हणायचे का? मोदींची खरोखरच विश्वासार्ह असती आणि महाराष्ट्रासाठी इथल्या मराठी माणसांसाठी मोदीनी काही केले असते, तर मराठी माणसाचे तारणहार असलेल्या राज ठाकरेंनी मोदींना विनाअट पाठिंबा दिला असता तर ते समजण्यासारखे होते. पण मोदींची विश्वासाहर्ता हा संशोधनाचा विषय आहे आणि हे ठावूक असताना राज ठाकरे केवळ मोदी साठी महायुतीला कसा काय पाठींबा देऊ शकतात? दुकानावर मराठी पाट्या लावण्यासाठी राज ठाकरेंच्या मनसेने आंदोलने केली. पण मुंबईतले गुजराथी मारवाडी इतके उन्मत्त झाले आहेत, की त्यांनी राज ठाकरें यांच्या आंदोलनाला तर जुमानले नाहीच! पण मराठी पाट्या बाबत सर्वोच्च न्यायालयाने जो आदेश दिला आहे, त्यालाही जुमनायला तयार नाहीत. परप्रांतीय विरोधी आंदोलनात मनसेच्या विरुद्ध सगळ्यात जास्त तक्रारी, मोदींच्या गुजराती मारवाडी लोकांनी केल्या होत्या. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे राज ठाकरे ज्यांना आपले दैवत मानतात, ते त्यांचे दिवंगत काका शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मोठ्या कष्टाने उभी केलेली शिवसेना, मोदींच्या इथल्या चेल्या चपट्यांनी फोडली. तरीही राज ठाकरे मोदींना बिनशर्त पाठींबा देत असतील, शिवसेना प्रमुखांना देव मानणाऱ्या मराठी माणसा समोर येण्याचा किंवा आपणच मराठी माणसाचे तारणहार असल्याचा दावा करण्याचा राज ठाकरेंना जराही अधिकार नाही. राज ठाकरे पासून मराठी माणूस आता कायमचा दुरावला आहे. कारण शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राने मोदींना केव्हाही मनापासून आपला नेता मानले नाही आणि त्याच मोदींसाठी राज ठाकरेंनी महाराष्ट्रातील मराठी माणसाला दुखवले आहे. याची फार मोठी किंमत त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणात चुकवावी लागेल.

# डॉ. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान हे प्रत्यक्ष जगण्याच्या प्रश्नांना भिडणारे कृतिप्रवण तत्त्वज्ञान -डॉ.नीळकंठ शेरे

## वर्तक महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

**वसई/प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान अमूर्त चिंतनातून उभे राहिलेले नसून ते मानवी जीवनाविषयीच्या वास्तविक प्रश्नांना भिडण्यामधून विकसित होत गेलेले कृतिप्रवण स्वरूपाचे तत्त्वज्ञान आहे. असे प्रतिपादन मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक आणि आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक डॉ. नीळकंठ शेरे यांनी आज वसई येथे केले. ते येथील विद्यावर्धिनी शिक्षणसंस्था संचालित अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन सभेत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान' या विषयावर बोलत होते होते. डॉ. शेरे यांनी सुरुवातीला अत्यंत सूत्रबद्धरीत्या तत्त्वज्ञान आणि जीवनव्यवहार यांचे नाते, तत्त्वज्ञानाविषयीच्या रूढ धारणा, अमूर्तीकरण आणि कृतीशीलता यातील द्वंद्व यांचा थोडक्यात आढावा घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तात्त्विक भूमिकेची पार्श्वभूमी या स्वरूपात, या भूमीत रुजलेल्या गौतम बुद्ध व महात्मा जोतिबा




फुले यांच्या भूमिकांचा परामर्श घेताना या तत्त्वज्ञानाचे जीवन परिवर्तनामधील योगदान त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर गौतम बुद्ध यांनी समकालीन श्रेष्ठी धनिकांशी संवाद साधत श्रमप्रतिष्ठेचे, मानवतेचे जे तत्त्वज्ञान मांडले त्याच्याशी डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे अनुबंध या विवेचनात त्यांनी सूचित केले. कार्ल मार्क्स आणि विविध पाश्चात्य मार्क्सवादी अभ्यासक, तत्त्वज्ञ यांनी माडलेल्या भौतिकताकेंद्री सिद्धान्तांबरोबरच कॉ.शरद पाटील यांनी केलेल्या मांडणीचाही उल्लेख त्यांनी केला. भारतातील उत्पादनसंबंधाचा पाया व त्यावर उभारली गेलेली शोषक दमनकारी होत जाणारी वर्णजातिव्यवस्था, कर्मविपाक सिद्धान्त आणि त्याची विविध समर्थने आणि त्या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांच्या सत्तेसोबत आलेले प्रबोधन, आधुनिकता, इहवाद, उदारमतवाद, प्रत्यक्ष प्रमाणवाद, बुद्धिप्रामाण्यवाद यांचे डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाशी असलेले नाते डॉ. शेरे यांनी या व्याख्यानातून स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या महामानवांना विविध जाती समुदायांच्या आणि मर्यादित पूर्वग्रहांच्या चौकटीत न पाहता त्यांच्या विचारातील व्यापकतेची समावेशकतेची दिशा लक्षात घेत पुढे जाण्याची आणि महापुरुषांनी निस्वार्थपणे केलेल्या कठोर परिश्रमाचा आदर्श घेत त्या मार्गावर महाविद्यालयांसारख्या उच्च शिक्षणसंस्थांनी मार्गक्रमण करण्याची आवश्यकता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजित कविसंमेलनात कवी वैभव सोनारकर, सखाराम डाखोरे आणि आत्माराम गोडबोले यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याशी संबंधित तसेच समकालीन परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या कविता सादर केल्या. विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष पांडुरंग गजानन नाईक यांच्या अध्यक्षतेखाली व उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, प्रा.स्वाती जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या शिक्षककक्षात झालेल्या या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. डॉ. शत्रुघ्न फड यांनी प्रमुख पाहुणे डॉ. निळकंठ शेरे यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. आत्माराम मनुरे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. आत्माराम गोडबोले यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

# राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक

**लातूर/प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाने राजकीय प्रचार जाहिरातींबाबत नियमावली ठरवून दिली आहे. यानुसार उमेदवारांनी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यासाठी ४१- लातूर लोकसभा मतदारसंघाकरिता माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समिती (एमसीएमसी) ची स्थापना करण्यात आली आहे. समिती कक्ष बार्शी रोडवरील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर कक्ष क्र. २१० येथे येथे स्थापन करण्यात आला आहे. उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या किमान तीन दिवस अगोदर प्रमाणिकरणासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. विहित नमुना एमसीएमसी कक्षात उपलब्ध आहे. एमसीएमसी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांत अर्ज निकाली काढण्यात येतील. जाहिरात नियमानुसार नसल्यास एमसीएमसी समितीला प्रमाणीकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन जाहिरात सादर करणे आवशयक आहे. प्रमाणिकराणासाठीचा अर्ज विहित नमुन्यात सादर करावा. त्यात जाहिरात निर्मिती खर्च, जाहिरात प्रसारण खर्च व कालावधी, उमेदवार किंवा पक्षाचे नाव, स्वतंत्र व्यक्ती असल्यास प्रतिज्ञापत्र आदी महत्वाच्या बाबींच्या नोंदीसह जाहिरात संहिता व दृक-श्राव्य चित्रीकरण सीडी किंवा पेनड्राइव्हमध्ये समितीकडे देण्यात यावा. उमेदवार व राजकीय पक्षाच्या ब्लॉग, संकेतस्थळावरील, वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवरून पोस्ट केलेला राजकीय स्वरुपाचा संदेश, मजकूर, छायाचित्र, व्हीडीओ मजकूर राजकीय जाहिरात समजली जाणार नाही, त्यामुळे त्यासाठी पूर्वप्रमाणीकरण आवशयक नाही. तथापि, जाहिरातीचे प्रमाणीकरण आवशयक आहे. एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांचा प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत. मुद्रीत माध्यमाद्वारे मतदान आणि त्यापूर्वीच्या दिवशी प्रकाशित करावयाच्या जाहिरातींचे प्रमाणीकरणही आवश्यक आहे.

# खासगी सांडपाणी प्रकल्पांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**विरार/प्रतिनिधी**

विरारच्या ग्लोबल सिटी येथे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामध्ये झालेल्या दुर्घटनेनंतर शहरातील सर्व खासगी प्रकल्पांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या खासगी सांडपाणी प्रकल्पाकडून सुरक्षेच्या नियमांचे आणि मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. ग्लोबल सिटी मधील प्रकल्पही मागील ६ महिन्यांपासून नादुरूस्त असल्याचे समोर आले आहे. मंगळवारी विरारच्या ग्लोबल सिटी येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या (एसटीपी) टाकी मध्ये साफसफाई करण्यासाठी गेलेल्या ४ कामगारांचा टाकीतील विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला आहे. या सांडपाणी प्रकल्पांच्या सुरक्षेचा मुद्दा या निमित्त पुन्हा उपस्थित झाला आहे. २० हजार चौरस फुटांचे बांधकाम करणाऱ्या विकासकांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधणे अनिवार्य आहे. हा प्रकल्प बांधल्यानंतर त्याच्या देखभाल दुरूस्तीचे काम अधिकृत कंपनीकडून करवून घेतले जाते. विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथे रुस्तमजी बिल्डरचे ३ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) आहेत. त्यापैकी रुस्तमजी शाळेला लागून असलेल्या एका सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात ही दुर्घटना घडली. या प्रकल्पात १४२ इमारतीच्या साडेतीन दशलक्ष लिटर्स सांडपाणाऱ्यावर प्रक्रिया केली जाते. प्रकल्पात २० फूट उंचीच्या दोन टाक्या आहेत. या सांडपाणी प्रकल्पाच्या देखभालीचे काम पॉलिकॉम इन्हवायरो इंजिनिर्यस या कंपनीला देण्यात आले होते. गेल्या ६ महिन्यांपासून प्रकल्पात बिघाड झाला होता. सतत दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. मात्र कंपनीने योग्य उपाययोजना केल्या नाहीत. परिणामी ४ कामगारांना आपला जीव गमवावा लागला. खासगी सांडपाणी प्रकल्पांचा आमचा संबंध नसल्याचे पालिकेने सांगितले आहे. मात्र यावर आता जोरदार टिका होऊ लागले आहे. प्रकल्प जरी खासगी असला तरी त्यावर नियंत्रण ठेवणे हे महापालिकेचे काम आहे. ते आपली जबाबदारी झटकू शकत नाही, असे भाजपाचे उपजिल्हाध्यक्ष मनोज बारोट यांनी सांगितेल. या सांडपाणी प्रकल्पात मार्गदर्शक तत्वांचे पालन केले जाते की नाही यावर पालिकेने



देखरेख ठेवणे आवश्यक होते. ज्या प्रकल्पात दुर्घटना घडली तेथे ६ महिन्यांपासून दुर्गंधीच्या तक्रारी येत होत्या. पालिकेने तेव्हाच दखल घेऊन कारवाई का केली नाही, असा सवालही बारोट यांनी केला. या दुर्घटनेप्रकरणी अर्नाळा सागरी पोलिसांनी पॉलिकॉम कंपनीचा पर्यवेक्षक महादेव कुपटे याला निष्काळजीपणे मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कलम ३०४, ३४ तसेच हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा योजनेस कर्मचाऱ्यांच्या प्रतिबंध आणि पुर्नवसन अधिनिय २-२३ च्या कलम ८, ९ अन्वये गुन्हे दाखल करून अटक केली होती. त्याला २ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. पॉलीकॉन इन्हायरो इंजिनियर्स प्रा.लि. कंपनीच्या मालकाविरोधात देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुर्घटनेच्या वेळी पर्यवेक्षक कुपटे घटनास्थळी नव्हता. आम्ही नेमके मार्गदर्शक तत्वे आणि नियम काय आहेत? त्याचा अभ्यास करत असून पुढील कारवाई केली जाईल असे अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी सांगितले. या दुर्घटनेच्या वेळी एकूण ५ कर्मचारी प्रकल्पाच्या ठिकाणी होते. सकाळी साडेदहा वाजता एक कामगार आत गेला. तो न आल्याने त्याला बघण्यासाठी इतर कामगार एका पाठोपाठ ४ कामगार आत गेले आणि त्या चौघांचा गुदमरून मृत्यू झाला. शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७) निखिल घाटाळ (२४) आणि सागर तांडेलकर (२९) अशी या दुर्घटनेत मरण पावलेल्या कामगारांची नावे आहेत. मात्र प्रकल्पावर उपस्थित असलेला ५ व्या कामगाराच्या पायाला दुखापत झालेली असल्याने तो टाकीत उतरला नाही. आपले ४ सहकारी न आल्याने त्याला शंका आली आणि मग त्याने अग्निशमन दलाच्या जवानांना कळवले. जर पायाला दुखापत नसती तर तो देखील आत मध्ये गेला असता आणि अनर्थ घडला असता.

## वसईत 'नायशा मांईड वेलनेस' सेंटरचं उद्घाटन

# कोविडच्या दाहक संकटात स्व.डॉ.हेमंत पाटील यांचं कार्य अतुलनीय -आ. हितेंद्र ठाकूर

**वसई/प्रतिनिधी**

वसईतील सुप्रसिध्द डॉ.हेमंत पाटील यांनी कोविडच्या दाहक संकट काळात वसई-विरार मधील शहरवासियांना अतिशय उत्तम वैद्यकीय सेवा दिली. महापालिकेच्या माध्यमातून संपूर्ण वसई-विरार क्षेत्रात सुरू करण्यात आलेल्या कोविड केअर सेंटरची रचना, वैद्यकीय मनुष्यबळ, तेथे आवश्यक सुविधा पुरविणे, रूग्ण व्यवस्थापन या सर्वच कामात डॉ. हेमंत पाटील हिरीरीने आघाडीवर राहिले. दुर्दैवाने त्यांना कोविडची लागण होवून त्यातच त्यांचं निधन झालं. एका प्रकारे कोविड संकट काळात डॉ. हेमंत पाटील यांनी वसई-विरार भागातील जनतेच्या सेवेसाठी आपला देह ठेवला. त्यांचं निधन म्हणजे वसई-विरार भागाची वैद्यकीय आरोग्य क्षेत्रात झालेली मोठी हानी असल्याचं प्रतिपादन आ. हितेंद्र ठाकूर यांनी वसईत बोलताना केले.

स्व.डॉ. हेमंत पाटील यांच्या स्नुषा डॉ. आदिती हिंगे-पाटील यांनी वसईत सुरू केलेल्या 'नायशा मांईड वेलनेस' या मानसिक आरोग्याबाबत सेवा देणाऱ्या केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी आ. ठाकूर बोलत होते. ते म्हणाले, डॉ. हेमंत पाटील यांनी इहलोकीची यात्रा संपवून जाताना, कुटुंबासाठी एक मोठा आदर्श वारसा ठेवून गेले आहेत. त्यांचे चिरंजीव डॉ. साकेत पाटील (स्त्री रोग तज्ज्ञ) व स्नुषा डॉ. आदिती हिंगे पाटील (सुवर्ण पदक प्राप्त-मानसोपचार तज्ज्ञ) हा वारसा समर्थपणे शाश्वत काळ सुरू ठेवतील असा आशावादही आ. ठाकूर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. विदर्भातून आलेल्या डॉ. हेमंत पाटील यांनी वसईला कर्मभूमी मानलं. येथील लोकांना आरोग्याच्या संदर्भात उत्तमोत्तम सेवा दिली व वसईकरांनी त्यांना आपल्यात सामावून घेतलं. लोकांना आपलसं कसं करावं हे डॉ. पाटील



कुटुंबाकडून शिकण्यासारखं असल्याचं आ. हितेंद्र ठाकूर म्हणाले. नव्याने सुरू होत असलेल्या 'नायशा मांईड वेलनेस' तर्फे वसईकरांना मानसिक आरोग्याबाबतची उत्तमोत्तम सेवा मिळेल असा आशावाद व्यक्त करत त्यांनी या उपक्रमास शुभाशिर्वाद दिले. 'नायशा माईंड वेलनेस क्लिनिक' हे स्व. डॉ. हेमंत दा. पाटील वसई पारनाका येथे ज्या जागी वैद्यकीय व्यवसाय करत होते, तिथे सुरु झाले आहे. डॉ. अदिती हिंगे पाटील या स्व. डॉ. हेमंत पाटील यांची स्नुषा आहेत. या वास्तूत डॉ. हेमंत पाटील यांनी अनेक रुग्णांना बरे केले. त्यांच्याकडे येणारा प्रत्येक रुग्ण हा बरा होत असे, अशी आठवण या प्रसंगी माजी महापौर प्रवीण शेट्टी व माजी उपनगराध्यक्ष संतोष वळवईकर यांनी करून दिली. मानसिक आरोग्य म्हणजे काय आणि मानसोपचार तज्ज्ञ तथा समुपदेशक यातील फरक डॉ. अदिती हिंगे पाटील यांनी आपल्या भाषणात अत्यंत सोप्या भाषेत स्पष्ट केला.

या क्लिनिक मध्ये 'सायकीयाट्रीस्ट' आणि 'सायकोलॉजीस्ट' यांची एक व्यावसायिक टीम एकत्रितपणे काम करणार असून त्याचा उपयोग मानसिक आरोग्य नीट राखण्यास मदत होणार आहे. सोबतच लहान मुलांसाठी 'प्ले थेरेपी' सोबत 'योगा' आणि 'मेडिटेशन' सारख्या सुविधा देखील उपलब्ध आहेत आणि पुढे 'ऑक्युपेशनल थेरेपी' देखील नजीकच्या काळात सुरु करण्यात येणार आहे. मानसिक आरोग्याबाबत सेवा देणारा वसईतील हा बहुधा पहिलाच मोठा प्रयोग असणं शक्य आहे. या प्रसंगी माजी महापौर नारायण मानकर, माजी नगराध्यक्ष अजय खोकाणी, माजी उपनगराध्यक्ष सागर महांबरे, वसई विकास बँकेचे माजी अध्यक्ष जगदीश राऊत, बँकेचे विद्यमान अध्यक्ष आशय राऊत, संचालक राजू पाटील, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती तथा वसई जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष संदेश जाधव, विरारचे माजी नगराध्यक्ष मुकेश सावे आणि बहुजन विकास आघाडीचे आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि स्थानिक रहिवासी उपस्थित होते. या 'क्लिनिक'चा चांगला उपयोग सर्वच नागरिकांना होऊन स्व.डॉ. हेमंत पाटील यांचे स्वप्न पूर्ण होईल असे डॉ. साकेत पाटील यांनी आभार प्रदर्शन करताना सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

15 TO 21 APRIL 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 4/13/2024 7:49 PM Page 1



# प्रमोद जाधव यांची पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

पालघर पोलीस दलातील उपआयुक्त कार्यालय नालासोपारा येथे कार्यरत असलेले प्रमोद जाधव यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल वाडा येथील त्यांच्या राहत्या घरी त्यांचा सत्कार करण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या वाडा व पालघर जिल्हा पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते. बौद्धाचार्य प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रम प्रारंभा झाला तर बुद्ध वंदनेने कार्यक्रम संपन्न झाला. नारायण जाधव हे पोलीस दलातून सेवनिवृत्त झाले असून त्यांचा मुलगा प्रमोद हा पोलीस दलात रुजू झाला होता आज त्यांच्या मुलाची पदोन्नती होऊन तो पोलीस उपनिरीक्षक झाला आहे. वडिलांच्या इच्छेप्रमाणे मुलगा पोलीस अधिकारी व्हावा असे स्वप्न पाहाणाऱ्या जाधव यांचे स्वप्न साकार झाल्याने अतिशय भावुकतेने वडिलांनी मुलाला पोलीसी पद्धतीने सॅल्युट केला हा क्षण सर्वाच्या कायम स्मरणात राहील. रामचंद्र देशमुख, जयवंत भोईर, प्रल्हाद मोरे, दत्तात्रय पठारे, पत्रकार युवराज ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रमोद यांना आशीर्वाद देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बौद्धचार्य विनोद वाघाचौरे, धम्मपाल ढवळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष प्रफुल सुपे, माजी जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड, सरचिटणीस किरण जाधव, माजी कोशाध्यक्ष वसंत गायकवाड, भीमराव बागुल, माजी नगरसेविका वर्षा गोळे, महाले आई, पोलीस पाटील नंदा बोरकर, प्रशांत गोखले तसेच समाज बांधव व माता- भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# वाडा तालुका सरपंच परिषदेच्या कार्यालायचे शानदार उदघाटन

**वाडा/प्रतिनिधी**



सरपंच परिषद वाडा तालुका अध्यक्ष रवींद्र विठ्ठल जोगवला यांच्या वाढदिवसानिमित्त वाडा तालुका सरपंच परिषदेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन रवींद्र जोगवला यांच्या हस्ते करून वाडा तालुक्यातील ८४ ग्रामपंचायतीच्या सरपंचांना आपले तालुका स्तरीय कामकाज करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ तयार करून दिले. नवनिर्वाचीत तालुका अध्यक्ष रवींद्र जोगवला व जिल्हा समन्वयक साक्षी साठे यांनी पुढाकार घेऊन तालुक्याच्या ठिकाणी आपल्या कार्यालयीन कामकाजासाठी येणाऱ्या सरपंच, उपसरपंच तसेच सदस्य गण व सर्व सामान्य गावकरी यांना हक्काचे बैठक स्थान उपलब्ध होण्या हेतू सदर कार्यालयाची संकल्पना मांडून ती पुर्णत्वास नेली. आज झालेल्या शानदार सोहळ्यात सदर कार्यालयाच्या उद्घाटनाच्या सोबत अध्यक्ष रवींद्र जोगवला यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा देखील पार पडला. या कार्यक्रमासाठी वाडा तालुका सरपंच परिषदेचे नवनिर्वाचित कार्यकारिणी तसेच बहुसंख्य सरपंच यांच्या सोबत जिल्हा परिषद सदस्य राजेश मुकणे, माजी सभापती तथा पंचायत समिती सदस्य योगेश गवा,भाजपा युवा नेते योगेश पाटील, संदिप पवार नरेश आकरे, शिवसेना शिंदे गटाचे नेते सुनील पाटील, अनंता वनगा, वाडा तालुका काँग्रेस पार्टी अध्यक्ष दिलीप पाटील, श्रमजीवी संघटनेचे पदधिकारी बाळाराम घाटाळ, आदिवासी आधार फाऊंडेशनचे अध्यक्ष कल्पेश ठाणगे, पत्रकार संजय लांडगे, पीक उपसरपंच दीपक पाटील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, कार्यकर्ते, तरुण मंडळ तसेच महिला मंडळ उपस्थित होते.

भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, श्रमजीवी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विवेक पंडित, शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नेते निलेश गंधे, राष्ट्रवादी अजित पवार गट नेते रोहिदास शेलार, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी पदाधिकारी बापू वाघात यांनी देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोतीराम नडगे यांनी केले तर प्रास्ताविक सरपंच परिषदेचे माजी अध्यक्ष भरत हजारे यांनी केले.उपाध्यक्ष पुष्पाताई चातुर्य यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पान १ वरून....

## दोन शेजाऱ्यांमधील वाद विकोपाला...

भीमराव गायकवाड याचा मुलगा प्रतिक याने त्याला बऱ्याचवेळेला समजावून सांगितले होते की, तु विनाकारण आम्हाला शिव्या देऊ नकोस तुझे आमचे काही पै पाहुण्याचे नाते नाही किंवा आपली भाऊबंदकी नाही आपण शेजारी आहोत एकमेकांना सांभाळून घेऊन राहुया. पण कायमच दारूच्या नशेत असणाऱ्या किशोर कदम याला प्रतिकने आपल्याला शहाणपणा सांगावे हे पटत नव्हते.कारण त्याच्या मते प्रतिक हा त्याच्यापेक्षा वयाने खूप लहान होता. त्याने आपल्याला शहाणपणा सांगून आपल्या अक्कलेचे तारे तोडू नयेत असे त्याला वाटत होते.त्यातच त्याच्या बायकोचे आणि प्रतिकच्या आईचे ही कधी पटत नव्हते. दोघीची कायम भांडणे ही होत होती. कधी घरासमोर कचरा टाकला म्हणून तर कधी पाणी टाकले म्हणून त्या दोघीत भांडणे ही होत होती. एकंदरीत दोघे ही शेजारी एकमेकांना समजून घेत नव्हते. किशोर याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने दारूच्या नशेत आपल्या अंगणात उभा राहून तो गायकवाड यांना शिवीगाळ करीत असायचा. या कारणातून मागे एकदा प्रतिक याने त्याला मारहाण ही केली होती. त्या मारहाणीत किशोर याला जबर मारहाण लागल्याने तो त्याचेवर चिडून होता. त्याने त्याला बघून घेण्याची भाषा केली होती. हल्ली किशोर याला दारू पिण्याचे व्यसन जास्तच लागले होते. तो कोणताही कामधंदा न करता दारू पिऊन शेजाऱ्यांना धमकावत होता. याचा राग प्रतिक याला येत होता. दोघे ही एकमेकांच्या शेजारी राहयला असले तरी त्याच्यातून विस्तव ही जात नव्हता. किशोरला कुणी काही समजावून सांगितले तर तो त्यांनाच उद्दामपणाची भाषा वापरून त्यांना त्याची वाट दाखवित होता. त्यामुळे त्याला हल्ली कुणी समजावून सांगण्याचे देखील सोडले होते. दारूच्या नशेत तो कोणाचा राग कोणावर तरी काढत होता. त्याच्या नादाला लागणे म्हणजे मुर्खपणाचे होते.शेजारी चांगला असेल तर शेजारधर्म पाळला जातो. एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी होता येते.सांगलीवाडीतील हारुगुडे प्लॉटमधील सर्वांना किशोर कदम याचा स्वभाव माहित होता.तो भांडखोर आणि व्यसनी आहे हे सर्वांना माहित होते.त्यामुळे कुणी त्याच्या नादाला लागत नव्हते. त्याच्या घराशेजारी राहणारे दुसरे इतर शेजारी ही त्याला विचारीत नव्हते. गायकवाड याच्याबरोबर किशोर कदम याचे भांडण ठरलेले असायचे. तो दारूच्या नशेत तो दुपार किंवा रात्री आला की गायकवाड यांना तो शिवीगाळ करून तुम्ही येथे कशाला राहता, घर विकून जावा नाही तर तुम्हाला बघूनच घेतो अशी धमकी देत होता. त्याच्या या वारंवारच्या धमकीला गायकवाड कंटाळलेले होते. तो दारू पिऊन विनाकारण भांडण उकरून काढून आपल्याला त्रास देतो म्हणून त्याच्या विरोधात त्यांनी पोलीस ठाण्यात मागे एकदा तक्रार ही दिली होती. त्यावेळी पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशनला बोलावून घेऊन सक्त ताकीद दिली होती. तरी ही त्याच्या वागण्यात काही फरक पडला नाही. तेंव्हापासून त्याची भांडणे आणखीनच विकोपला गेली होती. आपल्या विषयी पोलीस स्टेशनला तक्रार दिल्याचा राग किशोर याला होता. अलीकडे तो मुद्दामच दारू पिऊन येऊन गायकवाड याच्या घरासमोर उभा राहून त्यांना शिवीगाळ करीत बघून घेण्याची भाषा करीत होता. मंगळवार दि.२ एप्रिल २०२४ रोजी रात्री १०.३०च्या सुमारास प्रतिक गायकवाड हा आपल्या घरात जेवण करून घरातील लोकाबरोबर बोलत बसला असताना बाहेर उभे राहून किशोर कदम हा त्यांना शिवीगाळ करीत होता. त्यावेळी प्रतिक याने ही गोष्ट आपल्या आईला सांगितली. त्याच्या आईने त्याला तो दारूडा आहे.त्याच्याकडे तु लक्ष देऊ नकोस असे सांगून गप्प बसविले. प्रतिक हा घराबाहेर येत नाही म्हणून दारूच्या नशेत असणाऱ्या किशोर याने त्याला उकसावत ऐ...आईच्या पदरा आड लपणाऱ्या पोरा, तुला माज आला आहे का? म्हणत शिवीगाळ करू लागला.हे ऐकून प्रतिकचा राग अनावर झाला. थांब तुला आता बघतोच म्हणत तो ही भांडणाच्या तयारीनेच घराच्या बाहेर आला.त्याची नेहमीचीच भांडणे आहेत म्हणून इतर कुणी रात्रीच्या वेळी बाहेर आले नाहीत. प्रतिक हा बाहेर आल्यावर त्याने रागाच्या भरात किशोरच्या शर्टाला हात घालून त्याला धक्काबुक्की करीत खाली पाडले. दोघात हाणामारी सुरु होऊन दोघे ही एकमेकाच्या उरावर बसत होते. त्यातच प्रतिकने दारूच्या नशेत असणाऱ्या किशोरच्या तोंडावर बुक्की हाणली. त्याचवेळी किशोरच्या हाताला बाजुलाच पडलेला लोंखडी रॉड लागला. त्याने तो रॉड उचलला आणि प्रतिकच्या डोक्यात जोरात दोन तीन वेळा हाणला. डोक्यात लोंखडी रॉडने वार केल्याने प्रतिक ओरडतच खाली कोसळला.त्याच्या ओरडण्याने घरात असणारे त्याचे वडिल भीमराव गायकवाड आणि प्रमिला हे दोघजण त्याचे भांडण सोडविण्यास आले.त्यावेळी त्याच लोंखडी रॉडने किशोर याने भीमराव गायकवाड यांना ही जबर मारहाण केली.त्या मारहाणीत भीमराव यांना ही दुखापत झाल्याने ते ही गंभीर जखमी झाले. इकडे गल्लीत रात्रीच्या वेळी चाललेला गोंधळ बघून शेजारी ही बाहेर आले. प्रतिकची आई ओरडत होती. माझ्या मुलग्याला वाचवा हो म्हणत होती. लोकांना घटनास्थळाकडे येताना बघून किशोर याने तेथेच लोंखडी रॉड टाकून पळून गेला. इकडे गंभीर जखमी असणाऱ्या प्रतिक आणि त्याचे वडिल भीमराव यांना लोकांनी सांगली सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले. तेथे उपचार सुरू असताना बुधवार पहाटेच्या दरम्यान प्रतिक याचा मृत्यू झाला.तर भीमराव याच्यावर उपचार सुरू होते. खूनाच्या या घटनेची माहिती मिळताच सांगली शहर पोलीसांनी सांगलीवाडीतील हारुगुडे प्लॉट येथील घटनास्थळ गाठले. पंचनामा करून या घटनेची माहिती त्यांनी मयत प्रतिक याची आई प्रमिला गायकवाड याचेकडून आणि शेजाऱ्याच्याकडून घेतली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे. यातील संशयीत आरोपी हा कोण आहे याची ही पोलीसांना माहिती मिळाली होती. या घटनेनंतर संशयीत आरोपी हा पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. घटनेनंतर तो पळून जाऊन सांगलीवाडीतील कृष्णाच्या नदीच्या काठच्या ऊसाच्या शेतात लपून बसला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी त्याला तेथून ताब्यात घेतले.त्याला सांगली शहर पोलीस ठाण्यात आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता सुरूवातीला तो पोलिसांना उडवा-उडवीचे उत्तरे देत होता. त्याला पोलीसांनी पोलीसी खाक्या दाखविल्यावर त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती त्याने पोलीसांना दिली. या घटनेची लेखी फिर्याद मयत प्रतिक गायकवाड याची आई प्रमिला गायकवाड यांनी सांगली शहर पोलिसात दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रतिक भीमराव गायकवाड (वय २१) याच्या खून प्रकरणी किशोर नामदेवराव कदम (वय ४२) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी किशोर कदम याला कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लोंखडी रॉड जप्त केला. या घटनेचा तपास सांगली शहर पोलीस ठाण्याचे पो.निरी.संजय मोरे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गौतम कांबळे, संतोष गळवे आणि संदीप कुंभार हे करीत आहेत. दारूची नशा चढली की, माणुस स्वैर होतो आणि कुणाशी ही भांडण उकरून काढतो त्यातूनच अशा प्रकारच्या खूनाच्या घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## बँकेच्या कर्जावरून दोस्तीत दुष्मनी ...

मळ्यात पूर्वी राहयला आहेत. सध्या त्याने साईट नंबर १०२ येथे नगरपालिकेने बांधलेल्या रमाई आवास योजनेतील एका घरामध्ये घुसखोरी करून राहत होता. रामाई आवास योजनेतील काही घराचे बांधकाम तेथे झाले असून अजून बऱ्याच घरांचे बांधकाम रघडलेले आहे. त्याकडे कोणत्या ही शासनाच्या अधिकाऱ्याचे दुर्लक्ष नसल्याने या घरात खरे लाभार्थी कमी आणि बाहेरचे घुसखोरी करून राहणारेच जास्त अशी येथील परिस्थीती आहे.रोहित तडाखे हा तसा मोलमजुरी करून राहत होता. त्याच्या वडिलांचे गेल्या काही वर्षापूर्वी निधन झाल्याने तो आणि त्याची आई राधाबाई तडाखे असे दोघेच राहत होते. अलिकडे रोहित हा जवळच्या मित्रांच्या नादाला लागून दारू पित होता. त्याची राहुल पाथरवट याच्याबरोबर जास्त मैत्री झाली होती. रोहित आणि राहुल याचे एकमेकांच्या घरी येणे जाणे असल्याने त्याची मैत्री वाढली. यातून त्याच्यात देण्या घेण्याचा ही आर्थिक व्यवहार होत होता. राहुल पाथरवट हा तसा सराईत गुन्हेगार होता. त्याचेवर इचलकरंजी शहर पोलीस ठाणे, शिवाजीनगर पोलीस ठाणे, शहापूर पोलीस ठाणे आणि हुपरी पोलीस ठाण्यात त्याच्यावर वेगवेगळे गुन्हे दाखल होते हे रोहितला ही माहिती होते परंतु त्याच्यातील मैत्री घनिष्ट बनल्याने तो त्याचेबरोबर पार्टया करीत होता. राहुल याचेवर गुन्हे दाखल असल्याने त्याला दुचाकी गाडी घेण्यासाठी कोणत्या ही बँकेकडून आणि फायनान्स कंपनीकडून कर्ज मिळत नव्हते. त्यामुळे तो बैचेन झाला होता. त्याने ही गोष्ट आठ नऊ महिन्यापूर्वी रोहितला सांगितले. आपल्या मित्राला दुचाकी गाडी घ्यायची आहे आणि ती त्याला कोणतीही बँक देऊ शकत नाही मग आपणच त्याला मदत करावी असे रोहितला वाटले. एकदा दारूची नशा चढल्यावर चल यार, मी तुला माझ्या नावावर बँकेकडून गाडी घेऊन देतो असे रोहित त्याला म्हणाला. त्यानंतर दोन तीन दिवसांनी राहुल पाथरवट हा त्याचे मागे मला तुझ्या नावावर गाडी घेऊन दे मी त्याचे हफ्ते व्यवस्थीती फेडेन तु मला एवढी मदत कर असे म्हटल्याने रोहितला मित्र प्रेम आठवले. परंतु त्याला हे माहित नव्हते. मित्राची मैत्री ही कधी ही घराच्या उंबऱ्याच्या बाहेर ठेवायची असते. मैत्रीत व्यवहार आणला की, मैत्री संपते, त्यात कटूता येते. मित्राने गाडी मागितली म्हणून रोहित याने आपले सपूर्ण डॉक्युमेंटस देवून त्याला बँकेकडून दुचाकी गाडी घेऊन दिली. रोहितच्या नावावर जरी गाडी असली तरी त्याचे हफ्ता राहुल पाथरवट भरणार होता म्हणून रोहित ही त्या कर्जाबाबत बेफिकीर होता. असेच दोन तीन महिने गेले.राहुल याने पहिले दोन तीन हप्ते व्यवस्थीत भरले. पुढे तीन चार हप्ते त्याला भरता आले नाहीत. त्यातच मार्च एंड असल्याने कर्जाच्या वसुलीसाठी बँकेने रोहितच्या मागे तगादा लावला. बँकेचे लोक रोहितच्या घराकडे येवू लागल्याने तो ही बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांना वायदे सांगून थकला होता. त्याने राहुल पाथरवट याला तु बँकेचे हफ्ते भर नाही तर बँक गाडी ओढून नेते त्यानंतर तु मला विचारू नकोस असे सांगितले. त्यातच गेल्या आठवडयात बँकेने गाडी ओढून नेली. या प्रकरणातून त्या दोघात वाद झाला. ते दोघे ही दारू पित असताना या कारणातून त्याच्यात मारामारी ही झाली.यात रोहितने आणि राहुलने दोघांनी ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा केली. या घटनेनंतर दोघांच्या ही वाटा वेगळ्या झाल्या. परंतु गल्लीत आणि मित्रांत या प्रकरणाची चर्चा होत असताना दोघे ही एकमेकाला बदनाम करू लागले. दोघांच्या ही मित्रांनी या प्रकरणात दोघांना ही समजून सांगून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. परंतु राहुल पाथरवट याला खुमखुमी जास्त होती. मी जेल भोगून आलो आहे माझे कोण काय वाकडे करणार आहे आता रोहितला बघतोच असे तो आपल्या मित्रांना सांगत होता. बँकेने गाडी ओढून नेल्याने रोहितची बदनामी झाली होती तर राहुलने बँकेचे हफ्ते न दिल्याने गाडी ओढून नेली आहे असे त्याने आपल्या मित्रांना सांगितल्याने राहुलची बदनामी होत होती. त्यामुळे तो रोहितवर जास्तच चिडला होता.रोहित हा गल्लीत आपल्याला बदनाम करीत आहे त्याला चांगलाच धडा शिकवला पाहिजे असे राहुल पाथरवट याने आपला भाऊ संदेश पाथरवट आणि मित्र शंकर जावीर यांना सांगितले.या तिघांनी ही रोहितची गेम करायची असा प्लॅन केला. त्यासाठी ते संधी शोधु लागले होते. शुक्रवार दि.२९ मार्च रोजी राहुल, संदेश आणि शंकर यांनी फुल्ल दारू पिऊन रोहितचा शोध घेऊ लागले. त्यांना रात्री १०च्या सुमारास रोहित हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानाजवळून जाताना दिसला,राहुल याने त्याला वाटेत अडवून काय रे साल्या तुला माज आला काय थांब तुला दाखवितोच म्हणत त्याच्या शर्टाची कॉलर पकडली.त्याने कॉलर पकडल्यावर रोहितने मला सोड नाही तर बघ माझी पोरं येथे बोलावून घेतो असे म्हणाला, त्यावेळी संदेश पाथरवट आणि शंकर जावीर यांनी त्याला लाथाबुक्कयांनी मारहाण करायला सुरूवात केली. त्यांच्यात झटापट चालू असताना रोहित त्याच्या तावडीतून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना राहुल याने आपल्याकडील चाकू काढला आणि रोहितच्या दंडावर हातवर मानेवर सपासप असे वार केले. त्याचवेळी संदेशने ही आपल्याकडील चाकूने त्याचा गळा इतका जोरात चिरला की, रोहित हा रक्ताच्या थारोळ्यात ओरडत पडला. त्याच्या कंठाचे हाड बाहेर दिसू लागले. राहुलने आणि संदेशने त्याच्यावर वार करीत असताना रोहितने त्याचा वार चुकवण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी राहुलला ही दुखापत झाली होती. त्या तिघांनी केलेल्या हल्ल्यात रोहितचा जागीच मृत्यु झाला. त्याला मारून ते तिघे ही घटनास्थळावरून पळून गेले. तो पर्यंत ही घटना साईट नंबर १०२ मध्ये समजल्यानंतर रोहितचे मित्र त्याचे नातेवाईक आणि आई राधाबाई तडाखे हे घटनास्थळी आरडा ओरडा करीत आले. बघ्यांची ही गर्दी झाली होती. रक्ताच्या थारोळ्यात रोहित तडाखे हा पडला होता. तर बाजुलाच रक्ताने माखलेला चाकू ही पडला होता. कुणी तरी या घटनेची माहिती इचलकरंजी शहर पोलीसांना दिल्यावर पोलीस निरी.प्रविण खानापुरे हे आपल्या सहकाऱ्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली. घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक समीरसिंह साळवे यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली. घटनास्थळावरून संशयीत आरोपी पळून गेले असल्याने त्याच्या शोधासाठी त्यांनी पोलीसांना योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवून दिला.पोलीसांनी या घटनेची माहिती मयत रोहित तडाखे याची आई श्रीमती राधाबाई तडाखे याच्याकडून घेतली. त्यांनी मुलगा रोहित याच्याशी साईट नंबर १०२ मधील राहुल पाथरवट याच्याशी वाद झाला होता त्यातूनच त्यानेच माझ्या मुलाला मारून टाकले असावे अशी शंका व्यक्त केली. त्याचप्रमाणे आजुबाजुला काही शंकास्पद सापडते का याची पाहणी पोलीसांनी करून तपासाला सुरूवात केली. पळून गेलेल्या आरोपीचा पोलीस शोध घेत असताना घटनेनंतर काही तासातच या घटनेतील संशयीत आरोपी हे सांगली रस्त्यावरील राहुल पाथरवट याच्या मित्राच्या घरात राहुल पाथरवट आणि त्याचा भाऊ संदेश पाथरवट हे सापडले. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन इचलकरंजी शहर पोलीस ठाण्यात आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली सुरूवातीला त्यांनी ना चा पाढा वाचला परंतु त्यांना पोलीसांनी पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.या घटनेतील तिसरा संशयीत आरोपी शंकर जावीर हा फरार झाला होता त्याचा शोध पोलीस घेत होते. या घटनेची लेखी फिर्यात मयत रोहित याची आई श्रीमती राधाबाई बाळू तडाखे (वय ४५) यांनी दिली त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रोहित बाळू तडाखे (वय २४) याच्या खून प्रकरणी राहुल विनोद पाथरवट (वय ३०) संदेश विनोद पाथरवट (वय २६) आणि शंकर पुंडलीक जावीर (वय २२) रा.तिघे ही साईट नंबर १०२ आसरा नगर इचलकरंजी यांच्या विरोधात गु.रजि.नं.१४३ भा.दं.वी. कलम ३०२.३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून संशयीत राहुल पाथरवट आणि संदेश पाथरवट यांना इचलकरंजी येथील प्रथम वर्ग न्यायालयासमोर हजर केले असता मा.न्यायालयाने या दोघांना २ एप्रिल पर्यंतची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेतील तिसरा संशयीत आरोपी शंकर जावीर हा फरार असल्याने पोलीस त्याचा कसुन शोध घेत आहेत. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.प्रविण खानापुरे याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी. विजय गोडसे आणि त्याचे सहकारी करीत आहेत. मित्र कितीही जवळचा असला तरी त्याच्याशी व्यवहार करताना जपूनच करावा लागतो नाही तर त्या व्यवहारात कठूता निर्माण होते आणि त्यातूनच खूनाच्या अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## प्रियकर प्रेयसीचा शेतात रंगला ...

तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी चनबसप्पा रेवप्पा सलगरे वय ३५ रा. सलगरे वस्ती बरूर ता दक्षिण सोलापूर याला तीन तासात मंद्रूप पोलिसांनी अटक केली. या खून प्रकरणातील इतर चार आरोपी फरार आहेत. श्रीकांत अनिल नरोटे (वय २२ रा. नरोटे वस्ती नांदणी ता दक्षिण सोलापूर) आणि अनिता जनबसप्पा सलगरे (वय २९, रा.सलगरे वस्ती बरूर ता. दक्षिण सोलापूर) अशी खून झालेल्या दोन्ही प्रेयसी आणि प्रियकराची नावे आहेत. याबाबत मिळालेली माहिती अशी की नांदणी बरूर टाकळी शिवारातील सलगरे वस्ती येथे राहणाऱ्या अनिता चनबसप्पा सलगरे हिच्याबरोबर श्रीकांत नरोटे याचे दोन वर्षापासून अनैतिक संबंध असल्याच्या संशय पती चनबसप्पा सलगरे याला होता. यावेळी पती चनबसप्पा याने आपली पत्नी अनिता व तिचा प्रियकर श्रीकांत नरोटे यांना वेळोवेळी असे वागू नका म्हणून समज दिली होती. मात्र ते ऐकत नव्हते. अखेर बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास या दोघांना शेतातील घरात त्याने एकत्र पाहिल्यामुळे संतप्त झालेल्या चनबसप्पा सलगरे याने आपले साथीदार कल्लप्पा सिद्धाप्पा सलगरे, लक्ष्मण चंदू सलगरे, उमेश सुरेश सलगरे व नागप्पा माने यांच्या मदतीने आपली पत्नी अनिता आणि त्याचा प्रियकर श्रीकांत यांच्या मानेवर कुराडीने सपासप वार करून दोघांचा निघृण खून केला. दोघेजण मृत्यूमुखी पडल्यावर सर्व आरोपींनी तिथून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत हुले, पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे, सहाय्यक फौजदार संदीप काशीद, हवालदार अविनाश पाटील, श्रीकांत बुरजे, दिनेश पवार, सागर चव्हाण, कैलास राऊत, नाना अवघडे, विशाल कर्नाळकर आणि कविता बिराजदार यांनी धाव घेतले तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी मंद्रूप ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले रात्री उशिरापर्यंत मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याचे काम सुरू होते. पुढील तपास मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत होले हे करीत आहेत.

यावेळी खून झाल्याची माहिती मिळतात मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत हुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे व त्यांच्या टीमने घटनेतील आरोपी चलबसप्पा रेवप्पा सलगरे याला सलगर वस्ती सोलापूर येथून ताब्यात घेऊन त्याला तिथेच बेड्या ठोकल्या आहेत, इतर चार आरोपींचा शोध घेऊन त्यांनाही जेरबंद करण्यात आलेली आहे.

पान ८ वरून....

## स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर ...

लातूर तालुक्यातील हरंगुळ बु येथील माजी सरपंच श्री सूर्यकांत सुडे यांची कन्या भाग्यश्री ही सकल महाराष्ट्राची कन्या होती. तिच्यावर झालेला अन्याय उद्या आपल्यावरही किंवा आपल्या मुलीवरही होऊ शकतो. त्यामुळे अन्याय करणारां विरुद्ध आवाज उठवण्यासाठी यावेळी कु. भाग्यश्री सुर्यकांत सुडेला सर्व भाविक भक्तांनी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन दुष्ट वृत्तींचा निषेध करत त्यांना तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

## बहुजन विकास आघाडी स्वतंत्रपणे ...

प्रश्न सोडविले. हे सांगावे. आपले माजी खासदार बळीराम जाधव व गावित यांनी समोरासमोर चर्चा केल्यास त्याची प्रचिती येईल असे ते म्हणाले. महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्टा उपक्रमाअंतर्गत विवा महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींसाठी कोकण कन्या फूड व्हॅनची योजना राबविण्यात येत असून यातील आर्थिकदृष्टया सधन नसलेल्या विद्यार्थिनींना ही व्हॅन चालविण्यासाठी देण्यात येईल. त्याच विद्यार्थिनी व्हॅनमधील पदार्थ बनवतील व विकतील, अशी माहिती त्यांनी दिली. याच वेळी ऑटो रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण महिलांना देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण घेतल्यावर या महिला रिक्षा स्वतंत्रपणे घेऊन व्यवसाय करतील. शासनाच्या योजनेतून त्यांना हे करता येईल या उपक्रमाची देखील आ.हितेंद्र ठाकूर यांनी माहिती दिली. यावेळी आ.क्षितीज ठाकूर, माजी नगराध्यक्ष मुकेश सावे, संघटक सचिव अजीव पाटील व कॉलेजच्या उपप्राचार्या दीपा वर्मा, प्राध्यापक पाटील यांनी योजनेची माहिती दिली. महाविद्यालयाचे विश्वस्त संजीव पाटील यांनी आभार मानले.

15 TO 21 APRIL 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 4/13/2024 7:49 PM Page 1



# चोरीसाठी विमानाने मुंबईचा प्रवास, नागालँड आसाम येथील चोरट्याला ठाणे पोलिसांनी ठोकल्या बेड्या!



**ठाणे/प्रतिनिधी**

व्यवसायिक किंवा नोकरदार शक्यतो कामानिमित्ताने विमानाने मुंबईमध्ये प्रवास करत असतात. परंतु आसाममध्ये राहणारा मोईनुल इस्लाम हा चोरटा चोरीच्या उद्देशाने थेट आसाममधून मुंबईत प्रवास करत असे. गेल्या दोन वर्षांपासून तो चोरी करून पुन्हा विमानाने आसाम किंवा नागालँडमध्ये परतत होता. पोलिसांपासून बचावासाठी तो मोबाईल वापरणे टाळत होता. तसेच डोक्यावर विग घालून वावरत होता. अखेर ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने आसामध्ये जाऊन वेशांतर करत त्याला ताब्यात घेतले. त्याच्या अटकेमुळे मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे आयुक्तालयात दाखल असलेल्या २२ गुन्ह्यांची उकल झाली आहे. तसेच त्याच्याकडून ६२ लाख २४ हजार रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात घरफोडी आणि चोरींच्या गुन्ह्यात वाढ झाली आहे. त्यामुळे ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सर्व अधिकाऱ्यांना गुन्हे उघडकीस करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या भिवंडी कक्षामार्फत शोध सुरू झाला. साहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांनी साहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज केदार, पोलीस हवालदार अमोल देसाई, पोलीस नाईक सचिन जाधव, पोलीस शिपाई भावेश घरत आणि अमोल इंगेळ यांचे विशेष पथक स्थापन केले. भिवंडीतील नारपोली येथे एका घरफोडीच्या प्रकरणाचा तपास पथकाकडून सुरू होता. त्यावेळी यातील आरोपी मोईनुल हा आसाम किंवा नागालँडमध्ये वास्तव्यास असून तो चोरी करण्यासाठी विमानाने मुंबईत येतो. चोरी झाल्यानंतर तो पुन्हा आसाम किंवा नागालँड येथे विमानाने जातो अशी माहिती खबऱ्यांनी दिली. तसेच तो मोबाईल देखील वापरत नव्हता. त्यामुळे त्याला आसाममध्ये जाऊन अटक करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला. पोलिसांचे पथक आसाममध्ये गेले. येथील सामरोली गावाजवळील नदी किनारी तो वास्तव्यास असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यामुळे पोलिसांनी नदीच्या दुसऱ्या टोकाला वेशांतर करून राहण्याचा निर्णय घेतला. नदीमध्ये पोहण्याच्या बहाण्याने, गावात फेरफटका मारण्याच्या बहाण्याने पोलीस त्याच्या घराजवळ तपासासाठी जाऊ लागले. परंतु तो घरात येत नव्हता. त्यानंतर खबऱ्यामार्फत पथकाने माहिती घेतली असता, तो रमजान निमित्ताने सायंकाळी त्याच्या घरी येणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आसाम पोलिसांच्या मदतीने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबूली दिली. त्याच्या अटकेमुळे मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे आयुक्तालय क्षेत्रातील २२ गुन्हे उघडकीस आले आहेत. मोईनुल इस्लाम हा पूर्वी नवी मुंबई येथे वास्तव्यास होता. तेथील एका उपाहारगृहात तो काम करत होता. २०२२ मध्ये त्याला एका चोरीच्या प्रकरणात नवी मुंबई येथील कोपरखैरणे पोलिसांनी अटक केली. त्यानंतर त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली. तिथे त्याची इतर चोरट्यांसोबत ओळख झाली. त्यांच्यासोबत राहून त्याला या चोरीच्या वाईट कल्पना सूचल्या. जामीनावर सुटल्यानंतर तो चोऱ्या करू लागला होता. दोन वर्षांपासून तो चोरी करून पुन्हा विमानाने त्याच्या आसाम किंवा नागालँडमध्ये परतत होता. पोलिसांपासून बचावासाठी तो मोबाईल वापरणे टाळत होता. तसेच डोक्यावर विग घालून वावरत होता.

## कल्याणमधील बारावे कचरा प्रकल्पाला पुन्हा भीषण आग

**कल्याण/प्रतिनिधी**



कल्याण येथील बारावे येथील पालिकेच्या घनकचरा विभागाला गुरुवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीत केंद्रात साठवण केलेला सुका कचरा जळून खाक झाला. गेल्या दहा दिवसाच्या कालावधीत बारावे घनकचरा प्रकल्पाला लागलेली ही दुसरी आग आहे. आगीची माहिती समजताच पालिका अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परंतु, हा प्रकल्प शहराबाहेर असल्याने आणि वाऱ्याच्या जोरदार वेगामुळे आगीने तात्काळ रौद्ररूप धारण केले होते. दूरवरून आगीच्या धुराचे लोट दिसत होते. बारावे परिसरातील उंच इमारतीमधील रहिवासी या प्रकल्पाला लागणाऱ्या सततच्या आगीने त्रस्त आहेत. आग लागल्यानंतर धुराचे लोट घरात येतात. दारे, खिडक्या लावल्या तरी कचऱ्याची दुर्गंधी अनेक दिवस कायम राहते, असे रहिवाशांनी सांगितले. बारावे कचरा प्रकल्पात दररोज सुमारे १०० मेट्रिक टन सुका कचरा साठवण केला जातो. या कचऱ्याचे वर्गीकरण करून तो संबंधित कचरा घटक उत्पादकाकडे पाठविला जात होता. या कचऱ्यात ज्वलनशील घटक अधिक असतात, असे पालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. दुपारच्या वेळेत कडक उन्हामुळे हे घटक अधिक ज्वलनशील होऊन किंवा या कचऱ्यातील काही रासायनिक घटक एकत्र येऊन त्यामधून मिथेन वायू तयार होतो. त्यामुळे आग लागण्याची शक्यता वर्तविण्यात येते. काही वेळा या भागातून जाणारा वाटसरू पेटलेल्या सिगारेटचे थोटूक या कचऱ्यावर फेकून देतो. हळुहळू हे थोटूक अधिक प्रज्वलित होऊन लगतच्या कचऱ्याला पेटते करते. त्यामुळे अशा आगी लागतात. गेल्या आठवड्यातील आगीत प्रकल्पातील कचरा साठवण छत, तुकडे यंत्र, वर्गवारी यंत्राचे नुकसान झाले होते. अशाप्रकारे आगी पुन्हा लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी दहा दिवसापूर्वी घनकचरा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले होते. त्यात पुन्हा या भागात आगीची घटना घडली आहे. अशा घटना आधारवाडी कचरा केंद्रावर यापूर्वी होत होत्या. या भागात कचरा सपाटीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे या भागात कचरा वेचक आणि किंवा वाटसरू फिरकत नाहीत.

## विवाहित महिलेची आत्महत्या, पती, सासूविरोधात गुन्हा दाखल




**मुंबई/प्रतिनिधी**

दहिसर येथे १८ वर्षांच्या विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी वडिलांच्या तक्रारीवरून महिलेचा पती व सासूविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे, कौटुंबिक हिंसा केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोन्याचे दागिने व मोटारसायकलसाठी महिलेला शारिरीक व मानसिक त्रास दिल्यामुळे तिने आत्महत्या केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. ज्योती वडारी (१८) असे मृत महिलेचे नाव असून दहिसर पूर्व येथील केतकीपाडा परिसरातील घरात गुरूवारी साडीच्या साह्याने तिने गळफास घेतला. तिला शताब्दी रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. ज्योतीचे वडील मनोजकुमार रेड्डी यांनी याप्रकरणी दहिसर पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यानुसार ज्योती यांचे पती कैलास वडारी व सासू अनंतमा वडारी यांच्याविरोधात दहिसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जानेवारी महिन्यातच ज्योतीचा विवाह झाला होता. तक्रारीनुसार, काम केल्याशिवास सासू जेवण देत नसल्याचे ज्योतीने वडिलांना सांगितले होते. तसेच पतीने माहेरून मोटारसायकल व सासूने सोन्याचे दागिने आणण्यासाठी तिच्यामागे तगादा लावला होता, असे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे तिने आत्महत्या केल्याचा आरोप ज्योतीच्या वडिलांनी केला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश टाकणारे ठाणांग सूत्र आगम वाचना -प.पू.विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी

**जळगाव/प्रतिनिधी**



मनुष्य जीवनातील अंधार दूर करण्याची ताकद ही ज्ञानात आहे. हे ज्ञान म्हणजे दुसऱ्यांविषयी कल्याण भावना श्रेष्ठ असल्याची शिकवण देणारे हवे. मानवी जीवनाला प्रकाशमान करणारे ठाणांग सूत्र आगम वाचना हे पाप प्रवृत्तीपेक्षा धर्मवृत्ती ही श्रेष्ठ असल्याची शिकवण देते आणि धर्माची ताकद वाढविते, असे आचार्य भगवंत श्रीमद् विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी महाराज साहेब यांनी सांगितले. जैन हिल्स स्थित आकाश प्रांगण येथील 'हिरा संस्कार छत्र' येथे तिन दिवसीय जैन धर्मियांची मुख्य 'गाथा आगम वाचना' शिबीराचा आज समारोप झाला. यावेळी विजय रत्नसुंदरसुरीश्वरीजी महाराज साहेब श्रावक-श्राविकांना मार्गदर्शन करत होते.

या कार्यक्रमाचे सेवार्थी भवरलाल आणि कांताबाई जैन परिवार यांचा हृदय सत्कार गुरूदेवांच्या सान्निध्यात यावेळी करण्यात आला. हा सत्कार जैन परिवारातील ज्येष्ठ सदस्य संघपती दलिचंद जैन, जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन, अतुल जैन, विपणन प्रमुख अभय जैन, अभेद्य जैन, अभंग जैन, अन्मय जैन यांनी स्वीकारला. शाल, मोत्याचा हार असे पुरस्काराचे स्वरूप होते. श्री जैन श्वेतांबर मूर्तीपुजक संघाचे अध्यक्ष ललित लोडाया, प्रविण सिसोदिया, स्वरूप लुंकड, दिलीप गांधी, संजय गांधी यांच्यासह कौशीक संघवी, निखील कुसमगंज, प्रमोद भाई, कानजीभाई यांनी हा सत्कार केला. यावेळी सूत्रसंचालन नितीन चोपडा, संजय गांधी यांनी केले. ठाणांग सूत्रांचा उपयोग कसा करावा, बुद्धीगत की हृदयगत यावर विवेचन करताना आगम वाचना मधील सर्वात महत्त्वाचा सिद्धांत म्हणजे कर्मसिद्धात होय. श्रेष्ठ भावना ही मैत्र भावना ठेवावी, श्रेष्ठ व्रत अहिंसा, श्रेष्ठ दृष्टी अनेकांत दृष्टी, श्रेष्ठ भाव उपशम भाव, श्रेष्ठ रस शांत रस याचे हृदयगत आचरण करावे बुद्धीगत नाही. कुठलीही व्यक्ती, वस्तू, परिस्थिती हे आपल्याला दुःखी करत असेल, अपमानित करित असेल तर ती माझी स्वतःची चुक आहे पुर्वभवामधील पुण्याचा प्रभाव आहे, असेच समजावे. यासाठी धर्मबिंदू आणि धर्मरत्न हे प्रकरण वाचावे असेही महाराज साहेब सांगतात. गुरू शिष्याच्या नात्यांवर भाष्य करताना प्रभू श्रीरामासारखे गुरू शिष्याचे नाते असावे. आपल्या दृष्टीला चांगली वाटणारी गोष्ट आपल्या गुरूंना चांगली वाटेल असे नाही. आगम वाचन हे जीवनातील कोच, गाईड, कॅप्टन प्रमाणे काम करतात. सत्याचा आधार धरून जीवनात परिवर्तन करण्याचे काम हे विचार करतात. यासाठी संपूर्ण वातानुकुलित असलेल्या बसच्या ड्रायव्हरला उष्णतेच्या झळा सहन कराव्या लागतात, त्याच प्रमाणे गुरूंचे कार्यही असते. दिवसभरात सहा वेळा नवकार बोलण्याने सदगती प्राप्त होईल याची गॅरंटी नाही, मात्र नवकार प्रत्यक्ष आचरणात आणल्याने सदगती प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. असे विचार परमपूज्य विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी महाराज साहेब यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी श्रेयस कुमट, नरेंद्र सांडेचा, दीपक राखेचा, कमलेश बोरा, राजू कावड, सागर पाटील, अमित कोठारी, किरण जैन निबजिया, निखिल शाह, सुनील शेठ, राहुल कोठारी, महिपाल निबजिया, जीतू गांधी, कुणाल निबजिया, गौरव गांधी, नरेंद्र नानेशा, संजय कासवा, अजय मुणोत, दीपक निबजिया आदिंनी परिश्रम घेतलेत.

## मध्य रेल्वेकडून १०६४ मुलांची घरवापसी हरविलेली मुले सुखरूप पालकांच्या स्वाधीन

**मुंबई/प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा बलाने ऑपरेशन 'नन्हें फरिश्ते' अंतर्गत गेल्या आर्थिक वर्षात १,०६४ मुलांची सुटका केली आहे. 'चाईल्डलाईन'सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने हरविलेल्या या बालकांना सुखरूप त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. रेल्वे सुरक्षा बलाकडे रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत हरवलेल्या किंवा घरातून पळून आलेल्या मुलांच्या सुटकेसाठी इतर यंत्रणा आणि संस्थांच्या मदतीने आरपीएफ काम करत आहे. देशभरातील अनेक मुले मुंबईचे असलेले आकर्षण, कौटुंबिक कलह, भांडण, तसेच चांगल्या आयुष्याच्या शोधात कुटुंबीयांना न सांगता मुंबईत येतात. शहर व उपनगरांतील अनेक रेल्वेस्थानकांवर ही मुले आरपीएफ कर्मचाऱ्यांना आढळतात. यंदा 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत आरपीएफ पोलिसांनी एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीमध्ये मध्य रेल्वेवरील रेल्वेस्थानकांवरून १०६४ मुलांना त्यांच्या पालकांच्या सुखरूप स्वाधीन केले. या मोहिमेसाठी आरपीएफला चाईल्डलाईनसारख्या स्वयंसेवी संस्थेची मदत झाली आहे. दरम्यान मुंबई विभाग - ३१२, भुसावळ विभाग - ३१३, पुणे विभाग - २१०, नागपूर विभाग १५४, सोलापूर विभाग - ७५ या भागातील मुले घरी परतली आहेत.

## मयत व्यक्तीच्या नावाने दोन ग्रामस्थांनी जमिनीचा ११ कोटीचा मोबदला लाटला!

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीजवळील निळजे गावातील जमीन मालक व्यक्ती मयत झाली आहे हे माहिती असुनही निळजे गावातील दोन ग्रामस्थांनी त्या मयत व्यक्तीच्या नावाने बनावट सात बारा, फेरफार तयार केले. त्या आधारे बनावट दस्त नोंदणी करून मयत व्यक्तीची जमीन आपल्या मालकीची असल्याचे दाखवून त्या जमिनीमधून गेलेल्या विकास योजनेतील रस्त्याच्या भरपाईची ११ कोटीची रक्कम बेमालुपणे लाटली आहे. गेल्या महिन्यात घडलेला हा आर्थिक फसवणुकीचा प्रकार आता उघड झाल्याने मयताच्या नातेवाईकाने या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. या प्रकरणाने २७ गावात खळबळ उडाली आहे. या फसवणूक प्रकरणात मयत व्यक्तीचे नातेवाईक निळजे गावातील रहिवासी सुरेश आंबो खुटारकर (६७) यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. उत्तम गणा पाटील, सुदर्शन रोहिदास पाटील अशी आरोपींची नावे आहेत. ते निळजे गावातील रहिवासी आहेत. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार सुरेश आंबो खुटारकर यांचे वडील आंबो पांडू खुटारकर हे २०११ मध्ये मयत झाले आहेत. आंबो खुटारकर यांची निळजे गावाजवळ हेदुटणे रस्त्यावर ३० गुंठे वडिलोपार्जित जमीन आहे. ही जमीन रस्ते विकास योजनेने बाधित झाली आहे. या जमिनीचा शासनाकडून ११ कोटीचा मोबादला मिळणार होता. या जमिनीचे वारस सुरेश खुटारकर आहेत. या जमिनीचा शासनाकडून मोबदला मिळणार असल्याने निळजे गावातील ग्रामस्थ आरोपी उत्तम पाटील, रोहिदास पाटील यांनी तक्रारदार सुरेश खुटारकर यांना काहीही कळणार नाही अशा पध्दतीने त्यांच्या वडिलांच्या नावे जमीन विक्रीचा व्यवहार करणारी बनावट कागदपत्रे तयार केली. यामध्ये तहसीलदार कल्याण, शेत जमीन न्यायधिकरण हे लिहून देणार आणि मयत आंबो खुटारकर हे लिहून घेणार असा बनावट दस्तऐवज गेल्या महिन्यात तयार करण्यात आला. आंबो खुटारकर हे १४ वर्षापूर्वी मयत झाले असताना त्यांच्या नावे गेल्या महिन्यात ते हयात असल्याचे दाखवून आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार केली. ही जमीन खरेदी विक्रीची कागदपत्रे कल्याणच्या दस्त नोंदणी कार्यालयात दाखल करून ती नोंदणीकृत करून घेतली. आंबो खुटारकर हयात नाहीत हे माहिती असुनही आरोपींनी त्यांच्याकडून आपण जमीन खरेदी केली आहे असे दाखवून त्या जमिनीच्या सातबारा, फेरफारवर स्वतःची नावे चढवली. ही कागदपत्रे आंबो यांच्या जमिनीला शासकीय मोबदला मिळणार होता, त्या महसूल कार्यालयाकडे दाखल केली. या जमिनीचे मूळ वारस सुरेश खुटारकर यांना काहीही कळून न देता खुटारकर यांच्या जमिनीतून रस्ते भरपाईसाठी मिळणारा ११ कोटीचा मोबदला परस्पर काढून घेतला. सुरेश यांना आपल्या जमिनीतून शासकीय रस्ता सुरू असताना आपणास मोबदला का मिळाली नाही म्हणून त्यांनी महसूल कार्यालयात चौकशी केली. त्यावेळी हा फसवणुकीचा प्रकार उघडकीला आला. सुरेश यांनी याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. असाच प्रकार यापूर्वी निळजे गाव, भिवंडी भागात घडले आहेत.

## मजुरीचे पैसे दिले नाही म्हणून मालकाची चाकू भोसकून हत्या

**भिवंडी/प्रतिनिधी**

मजूरीचे १० हजार रुपये देण्यास उशीर केल्याने एका मजूराने कारखाना मालकाची हत्या केल्याचा प्रकार भिवंडीतील पूर्णा भागात उघडकीस आला आहे. अमित प्रजापती (२३) असे आरोपीचे नाव असून त्याला नारपोली पोलिसांनी अटक केली आहे. पूर्णा येथील हरिअंत कंपाऊंड परिसरात राकेश सिंह (४५) यांचा महाराष्ट्र पी.व्ही.सी. कंपनी नावाने कारखाना आहे. या कारखान्यात पाईप बनविण्याचे काम केले जाते. कंपनीत चार ते पाच मजूर असून काहीजण मजूरीवर काम करतात. अमित प्रजापती याने या कंपनीत २० दिवस मजूरी केली होती. त्यानंतर त्याने मजूरी करणे बंद केले. बुधवारी अमित हा राकेश यांच्या कार्यालयात आला. त्याने राकेश यांच्याकडे मजूरीची मागणी केली. परंतु राकेश यांनी काही कारणास्तव त्याच्याकडे १० दिवसांची मुदत मागितली. १० दिवसांत पैसे देतो असे आश्वासन त्यांनी अमित याला दिले. परंतु अमित याने राकेश यांच्यासोबत वाद घालण्यास सुरूवात केली. त्यानंतर त्याने राकेश यांना मारहाण करण्यास सुरूवात केली. अमित याने त्याच्यासोबत एक चाकू आणला होता. या चाकूने त्याने राकेश यांना छातीजवळ दोनवेळा भोसकले. या घटनेत राकेश हे गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती नारपोली पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी बुधवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अमित याला अटक केली आहे.

## तीन वर्षांनी हत्येला फुटली वाचा पोलिसांनी तिघांना ठोकल्या बेड्या

**विरार/प्रतिनिधी**




तीन वर्षांपूर्वी मुंबई अहमदाबाद महामार्गावर एका तरुणाचा झालेला अपघात हा नैसर्गिक मृत्यू नसून हत्या असल्याचं उघड झाले आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी ३ जणांना अटक केली आहे. अनैतिक प्रेम संबंधातून ही हत्या करण्यात आल्याचे उघड झाले आहे. ३ सप्टेंबर २०२१ रोजी मुंबई अहमदाबाद महामार्गावरील बापणे येथे वकील इद्रीसी (२७) या तरुणाचा मृतदेह आढळला होता. त्यावेळी विरार पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली होती. मात्र तपासामध्ये हा मृत्यू नैसर्गिक नसून हत्या असल्याचे उघड झाले आहे. पोखन साव (५०), इम्रान सिद्दीकी (२७) आणि अब्दुल शाह (२३) या तिघांनी मिळून ही हत्या केली आहे. मुख्य आरोपी पोखन साव याचे मयत वकील इद्रीसी याच्या पत्नीबरोबर अनैतिक संबध होते. त्यामुळे या प्रेम संबंधात अडसर ठरणाऱ्या वकील इद्रीसी याची हत्या करण्यात आली. या प्रकरणी विरार पोलिसांनी रविवारी रात्री दोन जणांना हत्येच्या गुन्ह्यात अटक केली आहे. आरोपींनी मयत वकील इंद्रिसी याला बळजबरीने रिक्षात बसवून महामार्गावर नेले. तेथे त्याला मारहाण करण्यात आली आणि मानेत दुचाकीची चावी घुसवून त्याची हत्या करण्यात आली.


## मासिक निवृत्तीवेतन ई-कुबेर प्रणालीव्दारे होणार जमा


**पालघर/प्रतिनिधी**

निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांचे निवृत्तीवेतन व इतर लाभ हे कोषागारामार्फत रिझर्व बँकेतून थेट त्यांच्या खात्यात जमा करणे करिता 'ई-कुबेर प्रणाली' विकसित करण्यात आलेली असुन त्याव्दारे यापुढे निवृत्तीवेतन व निवृत्तिवेतनविषयक लाभ मिळणार आहेत. सद्यस्थितीत पालघर कोषागार कार्यालय अधिनस्त निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना सी.एम.पी. प्रणालीद्वारे निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येत असून यापुढील कामकाज ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे. ई-कुबेर या प्रणालीची अंमलबजावणी करतेवेळी असे निदर्शनास आले आहे की, निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनी निवृत्तीवेतन सुरु करतेवेळी पालघर जिल्हयातील अधिकृत बँकेत खाते उघडले व नंतर सदर बँक खाते कोषागार कार्यालयाच्या अपरोक्ष इतर जिल्हयातील इतर बँकेत, शाखेत वर्ग करुन घेतलेले आहेत. संबंधीत खाते इतर बँकेत वर्ग केल्यामुळे बँक आय एफ.एस.सी. कोड मध्ये बदल झालेला आहे. ई-कुबेर प्रणालीत बँक शाखा आय.एफ.एस.सी. कोड तसेच संबंधितांची नावे अचुक असणे बंधनकारक असल्यामुळे जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर यांनी आवाहन केले आहे की, निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनी जिल्हयाबाहेर खाते वर्ग केले असल्यास ते खाते पालघर जिल्हयातील मुळ शाखेत वर्ग करावे व जिल्ह्यांतर्गत शाखा बदल केला असल्यास पुर्वीच्या बँकचे ना-देय प्रमाणपत्रासह नवीन बँक शाखेचे पासबूक प्रथम पृष्ठ छायांकित प्रत पालघर कोषागार कार्यालयास सादर करावी जेणेकरुन नियमित मासिक निवृत्तीवेतन मिळण्यास समस्या निर्माण होणार नाहीत, असे न केल्यास व निवृत्तीवेतन जमा होण्यास समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांची राहील.

15 TO 21 APRIL 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 4/13/2024 7:50 PM Page 1






## देवणीत रमजान ईद उत्साहात साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरासह तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरा करण्यात आली. मुस्लिम धर्मातील सर्वात मोठा सण ईद उल फित्र ची नमाज गुरुवारी देवणी शहरातील नेकणाळ रोड वरील इदगाह मैदानावर सकाळी दहा वाजता जामा मस्जिदचे इमाम मौलाना हाफिज नईम रहेमान पटेल यांच्या उपस्थितीत सामुदायिक नमाज पठण झाले. त्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या. रमजान ईदनिमित्त नमाज पठण करण्यासाठी ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधवांची गुरुवारी सकाळी हजारोच्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, भगवान पाटील तळेगावकर, डॉ.संजय घोरपडे, नागेश जिवणे यांच्या सह विविध सामाजिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील नागरिकांसह अधिकाऱ्यांनी मुस्लिम बांधवाची भेट घेत आलिंगन देत शुभेच्छा दिल्या.

### वसईतील ‘आम्ही गासकर संघटने’चा संविधान जागर मेळावा संपन्न

# लोकसभा निवडणूकीत संविधान विरोधीपक्षाचा पराभव करा -उल्का महाजन

**वसई/प्रतिनिधी**

संविधानाचे रक्षण करणे ही काळाची गरज लक्षात घेऊन वसईतील आम्ही गासकर संघटनेने शनिवारी ६ एप्रिल २०२४ रोजी गास गावात संविधान जागर मेळावा आयोजित केला होता. या संविधान जागर मेळाव्याला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ. उल्का महाजन आणि व्हिजेटीआयचे माजी डीन व राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष संजय मंगला गोपाळ हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी केंद्रातील भाजपप्रणीत मोदी सरकारवर कडाडून टिकास्त्र सोडले. भारतात लोकशाहीचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडुन वस्त्रहरण केले जात असल्याचे म्हणत येणाऱ्या लोकसभा निवडणूकी या संविधान विरोधी पक्षाचा पराभव करण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी भाजपाच्या विरोधात मतदान करण्याचे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ. उल्का महाजन यांनी वसईतील नागरिकांना केले. तसेच अबकी बार ४०० पारचा जे नारा देत आहेत, ते सत्तेत आल्यास पेट्रोल- डीजेल यांचे दर ४०० पार नक्की करतील अशी खोचक टिका संजय मंगला गोपाळ यांनी केली. संविधान वाचविण्यासाठी सर्वसामान्य जनतेने ही लोकसभा निवडणूक आपल्या हातात घेऊन भारतीय जनता पक्षाचा पराभव करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. ह्या जागर मेळाव्यात मूळगावातील महिला ग्रुपने लोकशाही व संविधान ह्या विषयावर पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमेय तुस्कानो यांनी केले. ह्या मेळाव्यात वसई तालुक्यातील अनेक राजकीय, सामाजिक कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर करणे हीच आमची संस्कृती -भागवताचार्य थडकर महाराज



**लातूर/प्रतिनिधी**

स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर करणे ही शिकवण आमची संस्कृती शिकवते असे उद्गार श्रीमद भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर यांनी लातूर तालुक्यातील हरंगुळ बु परिसरातील कैलास नगर येथे सुरू असलेल्या श्रीमद्भागवत कथा अमृतपान ज्ञानयज्ञ सोहळ्यातील चौथ्या पुष्पाहुतीच्या वेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी श्रीमद्भागवत कथेतील चौथ्या दिवसाच्या अख्यानात राजा परिक्षताच्या कथेतील सारांश सारांश सांगताना राजा परिक्षताच्या पूर्वजांनी म्हणजे स्त्री स्वाभिमान आणि संरक्षणासाठी सर्वस्व पणाला लावून दुष्ट कौरवांचा संहार केला आजही दुष्ट वृत्तींचा आपल्या समाज व्यवस्थेकडून समाज मनाकडून संहार केला गेला पाहिजे. समाजातील प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने उभी असलेली स्त्री आज खरीच सुरक्षित आहे का असा देखील प्रश्न यावेळी उपस्थित केला. ती समाज, गावात, गल्लीत, शहरात अगदी तिच्या शाळा, महाविद्यालय, कार्यालय अशा ठिकाणी असुरक्षित आहे. म्हणून तिच्या संरक्षणासाठी सरकार आणि व्यवस्थापनांनी लैंगिक शोषण किंवा स्त्री सुरक्षेसाठी कायदे करावे असे आवाहन देखील यावेळी केले. यावेळी भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर यांच्यासह गायनाचार्य शाम मोरे, सिंथवादक महादेव मस्के, पखवाजवादक कल्याण पवार गुरुजीसह कैलास नगर, गोविंद नगर, सदाशिव नगर सह हरंगुळ बु. परिसरातील नागरिक उपस्थित होते. श्रीमद्भागवत कथे दरम्यान ...पान ६ वर

# बहुजन विकास आघाडी स्वतंत्रपणे पालघर लोकसभा निवडणूक लढणार -आ.हितेंद्र ठाकूर



**विरार/प्रतिनिधी**

पालघर लोकसभेची जागा बहुजन विकास आघाडी स्वतंत्रपणे लढणार असून फक्त उमेदवाराचे नाव जाहीर होण्याची औपचारिकता बाकी आहे अशी घोषणा आ.हितेंद्र ठाकूर यांनी विरार येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केली. इतर राजकीय पक्षाच्या बॅनरवर सहयोगी पक्ष म्हणून बहुजन विकास आघाडीचे नाव आहे, असे विचारता ते म्हणाले की, सर्वच पक्ष माझे मित्र आहेत. मात्र या वेळेला या मित्र पक्षांनी या निवडणुकीत आपल्याला पाठिंबा द्यावा. पालघर जिल्ह्यात सहा पैकी तीन आमदार बहुजन विकास आघाडीचे असून मागील निवडणुकीत ४ लाख ९१ हजार मतदान बहुजन विकास आघाडीला झाले होते. यावेळी त्यात भर पडून आमचा उमेदवार विजयी होईल असे ते म्हणाले. पालघरमध्ये तिरंगी लढत होणार असून शिंदेगट व भाजप यांचा उमेदवार निवडणुकीत असणार आहे. शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या उमेदवार भारती कामडी यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. माजी खा.राजेंद्र गावित यांची खासदारकी लोकांच्या कामाच्या दृष्टीने प्रभावी झाली नाही. त्यांनी कुठले ...पान ६ वर

